महाराष्ट्र शासन

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम

योजनेची

## यशोगाथा पुस्तिका

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## उद्योग विभाग






# स्वयंरोजगारास देई आधार,
# हेच आपले सरकार!









# मनोगत



**श्री. एकनाथ शिंदे**

**मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**

महाराष्ट्र शासनाने राज्यात ग्रामीण तसेच शहरी भागात सूक्ष्म व लघु उपक्रम (प्रकल्प किंमत मर्यादा रु. ५० लाखांपर्यंत) स्थापित होणे व त्यामाध्यमातून रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) योजना नवीन क्रेडीट लिंक सबसिडी कार्यक्रम जाहीर केला आहे.

सदर योजना महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील उद्योग संचालनालय (DOI) मार्फत राबविण्यात येते. योजनेची अंमलबजावणी उद्योग संचालनालयाच्या नियंत्रणाखालील जिल्हा उद्योग केंद्रे (DICs), महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळे (KVIB) आणि बँकांद्वारे करण्यात येते. योजनेंतर्गत सबसिडी निर्धारित कालावधीनंतर लाभार्थी/उद्योजकांना त्यांच्या बँक खात्यांमध्ये अंतिम वितरणासाठी उद्योग संचालनालयामार्फत वितरीत केली जाते. योजनेच्या परिणामी अंमलबजावणीकरीता, नुकतेच 14 जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे.

योजनेद्वारे नवीन स्वयंरोजगार उपक्रम/ प्रकल्प/ सूक्ष्म उपक्रम/ लघु उद्योग (प्रकल्पाची किंमत रु. 50 लाखांपर्यंत मर्यादित) स्थापन करून राज्याच्या ग्रामीण तसेच शहरी भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत.

मला खात्री आहे की, हि योजना राज्यातील नव उद्योजकासाठी उपयुक्त ठरेल व इतर राज्यांसाठी एक मौलिक उदाहरण राहील आणि त्याचे अनुकरण केले जाईल.

# मनोगत



**श्री. देवेंद्र फडणवीस**

**मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**

महाराष्ट्र शासनाने राज्यातील ग्रामीण तसेच शहरी भागात सूक्ष्म आणि लघु उद्योगांच्या स्थापनेद्वारे रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सन 2019 मध्ये मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम जाहीर केला आहे. सदर योजना मुलत: रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी क्रेडिट लिंक सबसिडी कार्यक्रम आहे.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट पुढील पाच वर्षात सुमारे 1 लाख सूक्ष्म आणि लघु उद्योग स्थापन करून राज्यात 10 लाख रोजगाराच्या संधी निर्माण करणे हे आहे. यावर्षी सन 2023-24 मध्ये राज्यात 25000 उद्योग घटक स्थापन करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उद्योग संचालनालयाने जिल्ह्याचे मागासलेपण, बेरोजगारी, संसाधनांची उपलब्धता, आगामी तंत्रज्ञान आणि जिल्ह्यांची लोकसंख्या यावर अवलंबून एजन्सींना जिल्हानिहाय उद्दिष्टे वितरित केली आहेत.

सीएमईजिपी लाभार्थ्यांच्या यशोगाथा संकलित स्वरूपात माझ्या सर्वोत्कृष्ट प्रशंसांसह दस्तऐवजीकरण करण्यासाठी उद्योग संचालनालयाच्या प्रयत्नांची नोंद करताना मला आनंद होत आहे.

# मनोगत



**श्री. अजित पवार**
**मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) योजनेच्या यशोगाथांबाबत उद्योग संचालनालय पुस्तक प्रकाशित करीत असल्याचे पाहून आनंद होत आहे. सीएमईजीपी योजना महाराष्ट्र शासनाची  मिशन योजनांपैकी एक आहे, जी राज्याच्या ग्रामीण तसेच शहरी भागात सूक्ष्म आणि लघु उद्योगांच्या स्थापनेद्वारे रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी उद्योग संचालनालय (DOI) द्वारे राबविण्यात येते.

सदर योजनेला संपूर्ण महाराष्ट्रात नवीन उद्योग उभारून आणि राज्यभरात स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. मला आनंद होत आहे की राज्यातील 1 लाखाहून अधिक ग्रामीण आणि शहरी तरुणांना रोजगाराच्या संधी निर्माण करून 21 हजारांहून अधिक सूक्ष्म आणि लघु उद्योग घटकांना मान्यता दिली आहे. या योजने अंतर्गत  सन 2023-24 या आर्थिक वर्षाकरीता रु. 545 कोटी अर्थसंकल्पित करण्यात आले असुन याअंतर्गत 25000 सूक्ष्म व लघु उद्योग स्थापित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

मला आशा आहे की, या यशोगाथा बेरोजगार तरुणांना राज्यात मोठ्या प्रमाणात नवीन सूक्ष्म आणि लघु उद्योग उभारण्यासाठी प्रेरित करतील.

# मनोगत



**श्री. उदय सामंत**
**मा. मंत्री (उद्योग), महाराष्ट्र राज्य**

दूरदर्शी नेतृत्व, प्रभावी प्रशासन, चांगल्या दर्जाच्या पायाभूत सुविधा, वाहतूक आणि लॉजिस्टिक सपोर्ट, कुशल मनुष्य उपलब्धता, उत्तम कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती, उत्तम शिक्षण सुविधा आणि गुंतवणुकीला अनुकूल वातावरण या घटकांमुळे महाराष्ट्राला औद्योगिक परिस्थितीत आघाडीवर राहण्यास मदत झाली आहे.

महाराष्ट्र सरकारने नियमितपणे आणि वेळेवर उद्योग क्षेत्राच्या विशिष्ट आवश्यकतांचे पुनरावलोकन केले आहे आणि उद्योग क्षेत्रात विशिष्ट योजना जाहीर केल्या आहेत. मला वाटते की हा दृष्टीकोन आमच्या नेतृत्वाची स्थिती सुनिश्चित करण्यासाठी जबाबदार असलेल्या प्रमुख घटकांपैकी एक आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना (CMEGP) हो राज्याने जाहीर केलेल्या यशस्वी योजनेपैकी एक आहे.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) हा एक प्रमुख क्रेडिट लिंक्ड सबसिडी कार्यक्रम आहे. ज्याचा उद्देश पारंपारिक कारागीर आणि बेरोजगार तरुणांना मदत करून सूक्ष्म आणि लघु उद्योगांच्या स्थापनेद्वारे स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे आहे. तसेच पर्यायाने बेरोजगारी या समस्येवर उपाय शोधण्याचा प्रयत्न आहे. सदरचा प्रयत्न यशस्वी होत असून राज्याने स्वयंरोजगार पुरविण्यात आघाडी घेतलेली दिसून येते.

पुढे जाऊन राज्याने ग्रामीण तसेच शहरी भागात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होण्यास मदत करणाऱ्या सर्व बाबींमध्ये सुधारणा करण्यासाठी सतत प्रयत्न करण्यासाठी मी व सरकार प्रयत्नशिल राहिल असे आश्वासन देतो.

# मनोगत



**डॉ. हर्षदीप कांबळे**
**प्रधान सचिव (उद्योग)**

महाराष्ट्र राज्य हे उद्योजकांचे राज्य आहे. उद्योजकांच्या अनेक नव-नवीन कल्पना महाराष्ट्रात मांडण्यात आल्या व त्यांची अंमलबजावणी झाली. त्यामुळे महाराष्ट्राची औद्योगिक घोडदौड हा नेहमीच इतर राज्यांकरिता आदर्शाचा विषय राहिला आहे.

अशा परिस्थितीत नव उद्योजकाच्या कल्पनांना आर्थिक पाठबळाची नेहमीच गरज असते ही बाब विचारात घेऊन राज्याने मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा श्रीगणेशा केला. त्यात योजनेला संपूर्ण राज्यातून भरगोस प्रतिसाद मिळाला, ज्यामुळे आज राज्यात 12000 पेक्षा अधिक उद्योजकांना मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत कर्ज मंजूर करण्यात येऊन 276 कोटी अनुदान मंजूर केले आहेत.

1 लाख कोटी डॉलर्स अर्थव्यवस्थेचा एक भाग म्हणून नविन आर्थिक धोरणांतर्गत मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना ही 1 ऑगस्ट 2019 रोजी जाहीर करण्यात आली आहे. यातून राज्यातील कुशल/अकुशल मनुष्यबळाच्या हातांना काम मिळून त्यांचा रोजगाराचा प्रश्न सुटेल व पर्यायाने राज्याच्या अर्थिक उत्पन्नात भर पडेल या दृष्टीने योजनेची आखणी करण्यात आलेली आहे.

या योजनेअंतर्गत निवडक यशस्वी उद्योजकांच्या यशोगाथा सादर केल्याबद्दल आज मी सीएमइजीपी च्या अधिकाऱ्यांचे मनापासून कौतुक करतो. मला खात्री आहे की, या यशोगाथा इतर व्यावसायिकांना तसेच उद्योजक बनू इच्छिणाऱ्या युवकांना प्रेरणा देतील.

# मनोगत



**श्री. दीपेंद्र सिंह कुशवाह**
**विकास आयुक्त (उद्योग)**

महाराष्ट्र शासनाने बेरोजगारीवर मात करण्यासाठी ग्रामीण तसेच शहरी भागात सूक्ष्म आणि लघु उद्योग प्रकल्प स्थापन करून रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) योजना घोषित केली आहे. योजनेअंतर्गत उत्पादन आणि सेवा क्षेत्रासाठी जास्तीत जास्त प्रकल्प खर्च मर्यादा अनुक्रमे 50 लाख आणि 20 लाख आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत लाभाच्यांच्या वर्गवारीनुसार प्रकल्प खर्चामध्ये लाभार्थीचे योगदान 5% ते 10% आहे आणि एकूण प्रकल्प खर्चाची शिल्लक रक्कम बँकांकडून मुदत कर्ज म्हणून प्रदान केली जाते. तसेच योजनेत इतर मागास प्रवर्ग, भटक्या जाती व जमाती, अल्पसंख्यांक यांचा विशेष मागास प्रवर्गात नुकताच समावेश करण्यात आलेला आहे.


सन 2022-23 मध्ये राज्याने 12 हजार 326 प्रकरणांना मंजुरी दिली आहे, ज्यामध्ये रु. 276 कोटी मार्जिन मनी समाविष्ट आहे. यामध्ये 5 हजार 596 प्रकरणे उत्पादन क्षेत्रातून आणि सेवा क्षेत्रातून 6 हजार 731 प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत. मला हे सांगताना आनंद होत आहे की, राज्याची यंदाची कामगिरी मागील वर्षाच्या तुलनेत 250% पेक्षा जास्त आहे आणि मी सीएमईजीपी अधिकाऱ्यांच्या प्रयत्नांची मी प्रशंसा करतो.

उद्योग संचालनालय मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) योजनेच्या यशोगाथांवरील पुस्तक उद्योग संचालनालय प्रकाशित करत आहे याचा मला खूप आनंद होत आहे आणि मला खात्री आहे की या यशस्वी उद्योजकांनी शेअर केलेला अनुभव राज्यभरातील भावी उद्योजकांना प्रेरणा देईल.

# सीएमईजीपी संघ



**(संजय देगावकर)**
संयुक्त सचिव (उद्योग-7)



**(संजय कोरबू)**
अतिरिक्त उद्योग संचालक



**(विजू सिरसाठ)**
अधिक्षकीय उद्योग अधिकारी



**(राजिव राजमाने)**
कक्ष अधिकारी (उद्योग-7)



**(भाग्येश जावळे)**
सहाय्यक (उद्योग-7)



**(संजग बांगर)**
उद्योग उपसंचालक



**(माधव ठुसे)**
उद्योग अधिकारी



**(अनिल कुकडे)**
उद्योग अधिकारी



**(शमा दलाल)**
उद्योग निरिक्षक



**(रुपाली कापसे)**
उद्योग निरिक्षक



**(विशाल शिंदे)**
कनिष्ठ सहाय्यक

## सहाय्यक संघ- एमसीडडी



**(चारुशिला धर्माधिकारी)**
प्रकल्प अधिकारी-आय टी



**(अक्षय पारधे)**
प्रकल्प अधिकारी-आय टी



**(तनवी कशाळकर)**
सहाय्यक



**(पूजा सकपाळ)**
सहाय्यक

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम
MAHA-CMEGP.GOV.IN

## तांत्रिक संघ- सीट्टा



**(केतन जोशी)**
प्रकल्प समन्वयक



**(भरत उके)**
सॉफ्टवेअर अभियंता

## मीटकॉन



**(सुनिल बोरचाटे)**
सहाय्यक व्यवस्थापक



**(संजित पवार)**
प्रकल्प समन्वयक

उद्योग संचनालय
सीएमईजीपी पुरस्कार वर्ष 2022-23



# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना

महाराष्ट्र शासनाने दि. 1 ऑगस्ट 2019 रोजी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना नवीन क्रेडीट लिंक सबसिडी कार्यक्रम जाहीर केला आहे आणि दि. 11 नोव्हेंबर 2022 च्या शासन निर्णयान्वये त्यामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. सदर योजनेचा उद्देश राज्यातील ग्रामीण तसेच शहरी भागात सूक्ष्म व लघु उपक्रम (प्रकल्प किंमत मर्यादा रु. ५० लाखांपर्यंत) स्थापित होणे व त्यामाध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे असा आहे.


सदर योजनेची अंमलबजावणी व देखरेख उद्योग विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली उद्योग संचालनालय (DOI) उद्योग संचालनालयामार्फत केली जाते. सदर योजना उद्योग संचालनालयाच्या नियंत्रणाखाली जिल्हा उद्योग केंद्र (DICs), महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ (KVIB) आणि बँकांद्वारे राबविण्यात येते. योजनेंतर्गत अनुदान उद्योग संचालनालयामार्फत संबंधित बँकांकडे लाभार्थी/ उद्योजकांना त्यांच्या बँक खात्यांमध्ये अंतिम वितरणासाठी निर्धारित कालावधीनंतर पाठविण्यात येते.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) योजनेची सुलभ अंमलबजावणी होण्याकरिता सर्व प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आली आहे. योजनेच्या जलद व पारदर्शक अंमलबजावणीसाठी स्वतंत्र https://maha-cmegp.gov.in पोर्टल विकसित करण्यात आले आहे. अर्जादार आर्थिक सहाय्याकरिता आपला अर्ज अंमलबजावणी यंत्रणेच्या उल्लेखासह पोर्टलवर सादर करणे आवश्यक आहे. पोर्टलवर उपलब्ध अर्जाचा अर्जाचा नमुना स्वयंस्पष्ट असून त्यामध्ये अर्ज भरण्यासाठी मार्गदर्शक सूचना/ सल्ला टिपण देण्यात आले आहे. कोणतीही अडचण/ प्रश्न असल्यास अर्जदाराने जिल्हा स्तरावरील संबंधित अंमलबजावणी यंत्रणेकडे संपर्क साधावा.

जिल्हा स्तरावर लाभार्थ्यांची निवड जिल्हा उद्योग केंद्र, खादी व ग्रामोद्योग मंडळ तसेच बँकांच्या प्रतिनिधींद्वारे केली जाते. पोर्टलवर प्राप्त अर्जाची छाननी जिल्हास्तरावरील महाव्यवस्थापक यांच्या अध्यक्षतेखालील स्थापित जिल्हास्तरीय छाननी व समन्वय उपसमितीद्वारे केली जाते, ज्यामध्ये जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, जिल्हा समन्वयक- महिला आर्थिक विकास महामंडळ, सहाय्यक आयुक्त- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, प्रकल्प अधिकारी-

अधिवासी विकास विभाग, जिल्ह्यातील दोन प्रमुख बँक प्रतिनिधी, जिल्ह्यातील दोन प्रमुख औद्योगिक संघटना/संस्था /औद्योगिक संघटना/ संस्था/ औद्योगिक समूह प्रतिनिधी, व्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र हे सदस्य आहेत. जिल्हाधिकारी / उप आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कार्यबल समितीच्या छाननी अंती मान्यता दिलेले प्रस्ताव संबधित बँकांना शिफारस करण्यात येतात. अर्जांचा समूह टाळण्यासाठी बँकर्सचा सुरवातीपासूनच सहभाग घेण्यात यावा. ज्या अर्जदारांनी आधीच उद्योजकता विकास कार्यक्रम (EDP) / निवासी उद्योजकता विकास कार्यक्रम (REDP) अंतर्गत किमान दोन आठवड्यांचे प्रशिक्षण घेतले आहे, त्यांना पुन्हा EDP प्रशिक्षण घेण्याची आवश्यकता नाही. अशा अर्जदारांना DLTFC दरम्यान निवड प्रक्रियेत प्राधान्य दिले जाईल.

## पात्रता निकष:




**सीएमईजीपी अंतर्गत आर्थिक सहाय्याचे प्रमाण आणि स्वरूप**

- उत्पादन क्षेत्रांतर्गत प्रकल्प/ युनिटची किंमत कमाल मर्यादा रु.50 लाख आणि रु. 20 लाख सेवा क्षेत्रांतर्गत.

❖ सार्वजनिक क्षेत्रातील बँक, राज्यातील सर्व प्रादेशिक ग्रामीण बँक, एसएलएमसी द्वारे मंजूर खाजगी क्षेत्रातील शेड्यूलड बँक आणि 14 जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक इ. वित्तीय संस्था मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत 60 ते 75% कर्ज मंजूर करतील.

| सीएमईजीपी अंतर्गत लाभार्थ्यांच्या श्रेणी | लाभार्थींची स्व:गुंतवणूक (प्रकल्प खर्चाचे) | देय अनुदान (प्रकल्प खर्चाच्या) | |
|---|---|---|---|
| क्षेत्र (युनिटचे स्थान/प्रकल्प) | | शहरी | ग्रामीण |
| खुला श्रेणी | 10% | 15% | 25% |
| विशेष श्रेणी (अजा/अज/महिला /माजी सैनिक/ दिव्यांग /इमाव / विजभज/ अल्पसंख्याक यांचा समावेश आहे). | 5% | 25% | 35% |

**अपात्र घटकांची यादी (Negative List) :**

सीएमईजीपी अंतर्गत सूक्ष्म घटक/ प्रकल्प/ युनिट्स स्थापन करण्यासाठी अपात्र घटकांची यादी खालीलप्रमाणे आहे.

1) मांस प्रक्रिया/ कत्तल/ कॅनिंग आणि/किंवा त्यापासून बनवलेले पदार्थ, उत्पादन/ उत्पादन किंवा मादक पदार्थ- बिडी/पान/सिगार/सिगारेट इत्यादीची विक्री, ढाबा किंवा दारू सेवा देणारे विक्री केंद्र, कच्चा माल म्हणून तंबाखू तयार करणे/उत्पादन करणे, विक्रीसाठी ताडी टॅप करणे, इ. शी संबंधित कोणताही उद्योग/व्यवसाय.

2) चहा, कॉफी, रबर इ. रेशीम शेती (कोकून पालन), फलोत्पादन, फुलशेती या पिकांच्या लागवडीशी संबंधित कोणताही उद्योग/व्यवसाय.

3) पशुसंवर्धनाशी संबंधित कोणताही उद्योग/व्यवसाय जसे की शेळी/मेंढी पालन, डुक्कर पालन, कुक्कुटपालन इ.

4) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र.प्लास्टिक2018/सी.आर. No.24/TC-4, दिनांक 23 मार्च 2018 अन्वये प्रतिबंधित केलेले प्लॅस्टिक, पॉलिथिन आणि थर्माकोल उत्पादने आणि संबंधित उत्पादने.

5) केंद्र शासन /राज्य शासनाने प्रतिबंधित केलेले कोणतेही इतर उत्पादन/ घटक.

अ.क्र # अनुक्रमाणिका पान क्र

## अमरावती


1. ॲन्टेलोप इलेक्ट्रीकल्स इंडस्ट्रीज, अकोला 1
2. काष्ठशिल्प, अकोला 2
3. नमिता इंटरप्रइझेस, अकोला 3
4. श्री. धनराज फूड, अकोला 4
5. सर्वज्ञ दूध डेरी, अमरावती 5
6. तुळजाई भंडार, अमरावती 6
7. दंत चिकित्सालय, अमरावती 7
8. दुर्वांकुर थर्मोफॉर्मर्स, अमरावती 8
9. श्री. साई ट्रेडर्स, बुलढाणा 9
10. देवांश दाल मिल, बुलढाणा 10
11. मिनी डाल मील, वाशिम 11
12. वेदीका इंडस्ट्रिज, यवतमाळ 12
13. सिध्दिविनायक फूड प्रोडक्टस, यवतमाळ 13
14. मेसर्स. ए.जी. मार्केटींग, यवतमाळ 14


## छ. संभाजी नगर


15. उर्मिला फूड प्रोडक्ट्स, बीड 15
16. मॅन्युफॅक्चरींग ऑफ पीपी आणि लेनो बॅग्स, धाराशिव 16
17. मिनी डाल मिल, छ. संभाजी नगर 17
18. रो वॉटर फिल्टर प्लँट, जालना 18
19. श्री. ऑटो गॅरेज, जालना 19

# कोकण


20. काजू उत्पादन, पालघर 20
21. समोसा उत्पादन, पालघर 21
22. पी.व्ही.सी पाईप उत्पादन, रत्नागिरी 22
23. युनीट काजू / चिरोंजी प्रकिया (सुका मेवा), रत्नागिरी 23
24. श्री. गणेश चोकोबाईट्स, सिंधुदुर्ग 24
25. रेडिमेड गारमेंट, ठाणे 25


# मुंबई


26. आयुर्वेदिक-फूड व्यवसाय, मुंबई 26


# नागपुर


27. फॅब्रिकेशन वर्क, भंडारा 27
28. न्यू मॉडर्न जेन्टस पार्लर, गडचिरोली 28
29. बांबू हस्तकला, चंद्रपूर 29
30. नेट कॅफे, गडचिरोली 30
31. श्री. पॅकेजिंग, गोंदिया 31
32. राइस मिल, गोंदिया 32
33. चहा आणि नास्ता, नागपुर 33
34. लाकूड आणि धातू कलाकृती उत्पादन, नागपूर 34
35. बेस्ट बिल्डिंग सॉल्युशन, वर्धा 35
36. बायोमास ब्रिकेट्स, वर्धा 36


# नांदेड


37. एस. डी. इंडस्ट्रिज, हिंगोली 37
38. साई गृह उद्योग, परभणी 38

39. रुद्र क्रिएशन, नांदेड 39
40. पोहा, लातूर 40

# नाशिक

41. मेसर्स. विद्या ॲग्रो फूड प्रोसेसिंग, धुळे 41
42. ड्रोन स्प्रे  सर्विस-कृषी क्षेत्र, जळगाव 42
43. बेकरी उत्पादन, जळगाव 43
44. ॲल्युमिनियम सेक्शन वर्क, नंदुरबार 44
45. सोय टोफू आणि फळांच्या रसांचे उत्पादन, नाशिक 45

# पुणे

46. डायनामॅक्स इंजिनिअरिंग, कोल्हापुर 46
47. कावडे मशिन वर्क्स, कोल्हापुर 47
48. पी.जे. इंडस्ट्रिज, पुणे 48
49. विटा निर्मिती व्यवसाय, सांगली 49
50. प्लॅस्टिक इंजेक्शन मोल्ड उत्पादन, सातारा 50
51. बिल्डमास्टर प्रायवेट लि. सोलापुर 51

# ॲन्टेलोप इलेक्ट्रिकल्स इंडस्ट्रिज, अकोला



- **उद्योजकाचे नाव आणि पत्ता:**
  श्री. सोमनाथ दिपक हिंगे
  जिल्हा-अकोला

- **उद्योजकाचा प्रवर्ग:** ओ. बी. सी

- **उद्योगाचे/व्यवसायाचे नाव:**
  ॲन्टेलोप इलेक्ट्रिकल्स इंडस्ट्रिज



- **वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:**
  बँक ऑफ इंडिया, अकोट

- **प्रकल्प खर्च (रु.):** 10 लाख

- **वार्षिक उलाढाल (रु.):** 60 लाख

## थोडक्यात युनिटची माहिती:

श्री. सोमनाथ हिंगे यांनी २ वर्षे एल. ई.डी बल्ब तयार करण्याचा व्यवसाय केला. मात्र त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही, हार न मानता त्यांनी जिल्हा उद्योग केंद्र, अकोला यांच्या मदतीने महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजने अंतर्गत अर्ज केला. त्यांच्या युनिटसाठी रू. १० लाख रुपयांचे कर्ज बँक ऑफ इंडिया शाखा अकोट यांच्याकडून मंजूर झाले. हे युनिट स्थानिक पातळीवर प्रसिद्ध असून एल.ई.डी ट्युब, बल्ब ही उत्पादने तयार करतात. ज्याचा घरोघरी प्रकाश देण्याकरिता आवश्यकता आहे. हे युनिट त्यांना दरमहा रू. ५ लाखांची उलाढाल करत आहे. एक स्वावलंबी आणि अभिमानी उद्योजक इतर ०६ जणांना रोजगार देत आहे. श्री. सोमनाथ म्हणतात की, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा मी आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वत:च्या पायावर उभे केले आहे.

# काष्ठशिल्प, अकोला



## थोडक्यात युनिटची माहिती:

श्री. पंकज डोंगरे यांनी मागील 2 वर्ष काष्ठशिल्प व्यवसाय केला, परंतु त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही, हार न मानता त्यांनी जिल्हा उद्योग केंद्र, अकोला यांच्या मार्गदर्शनाखाली सीएमईजीपी योजनेसाठी अर्ज केला आणि या योजने अंतर्गत त्यांना ३ लाख रुपयांचे कर्ज विदर्भ कोकण ग्रामीण बँक, म्हैसंग यांचेमार्फत उपलब्ध झाले. "पंकज काष्ठशिल्प" या नावाने त्यांनी व्यवसायाचे युनिट सुरु केले. यावेळेसचा त्यांचा हा प्रयत्न यशस्वी ठरला. हे युनिट स्थानिक पातळीवर प्रसिद्ध लाकडी शिल्पे तसेच पारंपारिक सजावटीच्या काष्ठशिल्पांची निर्मिती करतात आणि ज्याचा वापर घरे आणि कार्यालये सजवण्यासाठी सर्वांकडून करण्यात येतो. या वस्तूंना सजावटीकरिता मोठी मागणी आहे. हे युनिट दरमहा ५० हजार रुपयांची उलाढाल करत आहे. आज ते एकूण ६ जणांना रोजगार देत आहेत. श्री. पंकज डोंगरे म्हणतात की, यासाठी मी सीएमईजीपी योजनेचा आभारी आहे. ज्यांनी आम्हा सारख्या लघु उद्योग व्यावसायिकांना प्रोत्साहन दिले.

- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :***
  *श्री. पंकज राजेंद्रा डोंगरे जिल्हा –परभणी*
- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *एस सी*
- ***उद्योगाचे/व्यवसायाचे नाव:***
  *पंकज काष्ठशिल्प*
- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *विदर्भ कोकण ग्रामीण बँक, म्हैसंग, अकोला*
- ***प्रकल्प खर्च (रू.):*** *३ लाख*
- ***वार्षिक उलाढाल (रू.):*** *६ लाख*
- ***उद्योजकाने दिलेला रोजगार :*** *६*

# नमिता इंटरप्राइझेस, अकोला



- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :***
  *सौ. नमिता उत्कर्ष महाजन*
  *जिल्हा – अकोला*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *सर्वसाधारण*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *नमिता इंटरप्राइझेस*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *आय.डी.बी.आय. बँक, अकोला*

- ***प्रकल्प खर्च (रू.):*** *१० लाख*

- ***वार्षिक उलाढाल (रू.):*** *१८ लाख*

## ***थोडक्यात युनिटची माहिती:***

*नमस्कार । मी नमिता महाजन. मला लहानपनापासूनच स्वत:चा व्यवसाय करण्याची इच्छा होती. मी मागील २ वर्षांपासून पेपर व पेन्सिल तयार करण्याचा व्यवसाय करत आहे. परंतू मला त्यामध्ये हवे तसे यश मिळत नव्हते त्यामुळे मी पुन्हा नव्याने सुरुवात करण्याच्या मार्गावर असताना मला जिल्हा उद्योग केंद्र, अकोला यांच्या तर्फे राबविल्या जाणाऱ्या शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची माहिती मिळाली व संधी न दवडता मी या योजने अंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी त्यांच्या मार्गदर्शनाने अर्ज केला व आयडीबीआय बँकेद्वारे मला १० लाखांचे कर्ज मंजूर झाले.*

*मी पर्यावरणाला अनुकूल असे कागद व पेन्सिल बनविण्याचे माझे उत्पादन पुन्हा नव्याने सुरु केले. या युनिटची मासिक उलाढाल ही १.५ लाखांची आहे. व या व्यवसायांतर्गत मी ३ लोकांना रोजगार उपलब्ध करुन देऊ शकले याचा मला आंनद आहे. या सहकार्याबद्दल मी जिल्हा उद्योग केंद्र, अकोला यांची आभारी आहे.*

# श्री. धनराज फूड, अकोला



- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता:*** *सौ. किरण कमलेश वर्मा, अकोला*
- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *सर्वसाधारण*
- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:*** *श्री. धणराज फुड*
- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *स्टेट बँक ऑफ इंडिया, अकोला शाखा*
- ***प्रकल्प खर्च*** *(रू.): ५० लाख व* ***वार्षिक उलाढाल*** *(रू.): १ करोड*
- ***उद्योजकाने दिलेला रोजगार:-*** *४०*

## थोडक्यात युनिटची माहिती:

*श्रीमती. किरण कमलेश वर्मा यांनी दोन वर्षे विविध खाद्यपदार्थ बनविण्याचा व्यवसाय केला, मात्र त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही, हार न मानता त्यांनी जिल्हा उद्योग केंद्र, अकोला यांच्या मदतीने महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेच्या मदतीने नवीन व्यवसायाची सुरुवात करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या युनिटचे नाव श्री. धनराज फूड इंडस्ट्रीज असून या प्रकल्पासाठी त्यांना रू.५० लाख रुपयांचे कर्ज स्टेट बँक ऑफ इंडिया, अकोला येथून मंजूर झाले. हे युनिट नमकीन, वेफर्स, पॉपकॉर्न यासारख्या प्रसिद्ध खाद्यपदार्थांचे उत्पादन करते. जे सर्वांना आवडतात. हे युनिट दरमहा रू. ८ लाखांची उलाढाल करत आहे. एक स्वावलंबी उद्योजक इतर ०५ जणांना रोजगार देत आहे. श्रीमती. किरण म्हणतात की, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वतःच्या पायावर उभे केले आहे.*

# सर्वज्ञ दूध डेअरी, अमरावती






## थोडक्यात युनिटची माहिती:

श्री. अक्षय अनासणे यांनी १० वर्षे दुध उत्पादनाचा व्यवसाय केला. मात्र त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही, हार न मानता त्यांनी जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती यांच्या मदतीने महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेच्या मदतीने नवीन व्यवसायाची सुरुवात करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे युनिट सर्वज्ञ दूध डेअरी या प्रकल्पासाठी रू. १ लाख ४३ हजार रुपयांचे कर्ज पंजाब नॅशनल बँक, अचलपूर येथून मंजूर झाले. हे युनिट स्थानिक पातळीवर दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन करते. जे सर्वांना आवडते आणि सर्वजण त्याची प्रशंसा करतात. हे युनिट त्यांना दरमहा रू. १ लाखांची उलाढाल करत आहे. एक स्वावलंबी आणि अभिमानी उद्योजक इतर ०७ जणांना रोजगार देत आहे. श्री. अक्षय म्हणतात की, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वतःच्या पायावर उभे केले आहे.

- **उद्योजकाचे नाव आणि पत्ता :**
  श्री. अक्षय सुभाषराव अनासणे
  मु. व्ही. एच. बी. कॉलनी, अचलपूर
  जि. अमरावती
- **उद्योजकाचा प्रवर्ग:** ओ.बी.सी
- **उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:**
  सर्वज्ञ दूध डेअरी (उत्पादन)
- **वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:**
  पंजाब नॅशनल बँक, अचलपूर कॅम्प
- **प्रकल्प खर्च (रू.):** १४३२००/-
- **वार्षिक उलाढाल (रू.):** १०००००/-
- **उद्योजकाने दिलेला रोजगार:** ७

# तुळजाई भांडार, अमरावती



- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता:***
  श्रीमती. अंजली राजेश जाधव
  आणि दामले प्लॉट, आठवडी बाजार,
  परतवाडा, अमरावती
- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** अनुसूचित जाती कैकाडी
- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  तुळजाई भंडार (उत्पादन)
- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  बँक ऑफ महाराष्ट्र, अचलपूर, अमरावती
- ***प्रकल्प खर्च (रू.):*** २ लाख
- ***मासिक उलाढाल (रू.):*** ५० हजार
- ***उद्योजकाने दिलेला रोजगार :*** २




***श्रीम. अंजली राजेश जाधव***

## थोडक्यात युनिटची माहिती:

श्रीमती. अंजली राजेश जाधव यांनी मागील ४ वर्षे तुळजाई भांडारचा व्यवसाय केला पण त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही, हार न मानता त्यांनी जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती यांच्या मदतीने महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेच्या मदतीने नवीन व्यवसायाची सुरुवात करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे युनिट तुळजाई भंडार या प्रकल्पासाठी त्यांना रू. २ लाख रुपयांचे कर्ज बँक ऑफ महाराष्ट्र, अचलपूर येथून मंजूर झाले. हे युनिट त्यांना दरमहा रू. ५० हजारांची उलाढाल करत आहे. एक स्वावलंबी आणि अभिमानी उद्योजक इतर ०२ जणांना रोजगार देत आहे. श्रीमती. अंजली म्हणतात की, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वत:च्या पायावर उभे केले आहे.

# दंत चिकित्सालय, अमरावती



- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :***
  *डॉ. दिप्ती शंकरराव निबूरकर*
  *जि. अमरावती*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *ओ.बी.सी*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *दंत सेवा (चिकिस्तालय)*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *स्टेट बँक ऑफ इंडिया, कँप*

- ***प्रकल्प खर्च (रू.):*** *७० हजार*

- ***वार्षिक उलाढाल (रू.):*** *५ लाख*

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार*** *:०२*

## ***थोडक्यात युनिटची माहिती:***

*डॉ. दिप्ती शंकरराव निबूरकर यांना स्वत:चे क्लिनिक सुरू करायचे होते परंतू पुरेसे भांडवल उपलब्ध नसल्याने त्यांना ते सुरु करण्यास अडचण येत होती. मदतीच्या शोधात असताना त्यांना जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती यांच्याकडून महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची माहिती मिळाली व या योजनेंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी त्यांनी अर्ज केला. त्यांना ७० हजार रुपयांचे कर्ज स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेकडून मंजूर झाले व त्यांनी त्यांचे स्वत:चे क्लिनिक सुरू केले. हे युनिट त्यांना दरमहा रू. ५० हजारांची उलाढाल देत आहे. एक स्वावलंबी आणि अभिमानी उद्योजक इतर ०२ जनांना रोजगार देत आहे. डॉ. दिप्ती म्हणतात की, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वत:च्या पायावर उभे केले आहे.*



*डॉ .दीप्ती शंकरराव निंबूरकर*

# दुर्वांकुर थर्मोफॉर्मर्स, अमरावती




- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता:***
- *सौ. स्नेहा सर्जेराव पाटील.*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *सामान्य*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
*रोपवाटिका/ रोपे/ प्रो ट्रेचे उत्पादन*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
*बँक ऑफ इंडिया, चांदूर (रेल्वे), अमरावती*

- ***प्रकल्प खर्च (रू.):*** *४० लाख*

- ***वार्षिक उलाढाल (रू.):*** *४० लाख*

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार:*** *०८*

## *थोडक्यात युनिटची माहिती:*

*दुर्वांकुर थर्मोफॉर्मर्सच्या मालक श्रीमती स्नेहा सर्जेराव पाटील यांनी महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेच्या मदतीने व्यवसाय सुरु केला. कृषी क्षेत्राच्या उन्नतीसाठी आणि ग्रामीण भागात महिलांना रोजगार निर्माण करण्यासाठी नेहमीच त्यांची काम करायची इच्छा होती. त्यासाठी कृषी क्षेत्रातील व्यवसायाचा विस्तार करण्याचे त्यांचे ध्येय आहे.*

*वरील उद्योग घटक रोपवाटिका प्रो ट्रे तयार करण्याचा व्यवसाय करते ज्याचा उपयोग टिश्यू कल्चर उद्योग/ वीज, कृषी संशोधन प्रयोगशाळा, रोपवाटिका आणि साखर कारखाने यांमध्ये केला जातो. बियाणे मजबूत व निरोगी असावी यासाठी पाणी आणि खताच्या वापरासह वनस्पतींच्या गुणवत्तेत सातत्य राखण्यासाठी केला जातो.*

*या युनिटसाठी त्यांना बँक ऑफ इंडिया, चांदूर शाखेकडून 40 लाखांचे कर्ज मिळाले. आणि सध्या त्यांच्या युनिटची वार्षिक उलाढाल 40 लाख आहे.*

*सौ. स्नेहा पाटील म्हणतात की, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वतःच्या पायावर उभे केले आहे.*



*सौ. स्नेहा सर्जेराव पाटील*

# श्री साई ट्रेडर्स, बुलढाणा



- **उद्योजकाचे नाव आणि पत्ता :**
  श्री.आदर्श विलास घाटोळ

- **उद्योजकाचा प्रवर्ग:** ओ.बी.सी

- **उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:**
  श्री साई ट्रेडर्स आणि प्रोफाइल शीटचे उत्पादन

- **वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:**
  स्टेट बँक ऑफ इंडिया, खामगाव

- **प्रकल्प खर्च (रु.):** ५० लाख

- **वार्षिक उलाढाल (रु.):** ५ लाख

- **उद्योजकाने दिलेला रोजगार: ३**

## थोडक्यात युनिटची माहिती:

श्री. आदर्श घाटोळ यांनी चार वर्षे प्रोफाईल शीट उद्योगाचा व्यवसाय केला, परंतु अपेक्षित यश मिळाले नाही. हार न मानता त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेच्या मदतीने नवीन सुरुवात करण्याचा प्रयत्न केला. जिल्हा उद्योग केंद्र, बुलढाणा यांच्या मदतीने त्यांनी प्रोफाइल शीट इंडस्ट्रीज हे युनिट स्थापन केले. या प्रकल्पासाठी त्यांना स्टेट बँक ऑफ इंडियाकडून कर्ज मंजूर झाले. या युनिटची उलाढाल दरमहा रु.५० हजार इतकी आहे. एका स्वावलंबी आणि अभिमानी उद्योजकामुळे इतर ३ व्यक्तींना रोजगार मिळाला आहे. त्यामुळे मी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना चालना देण्याबरोबरच आमच्यासारख्या लोकांना स्वतःच्या पायावर उभे केले आहे.

# देवांश दाल मिल, बुलढाणा




- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :***
  *सौ. स्नेहा दिनेश चव्हाण*
  *गट क्र. ५६, येळगाव, ता.-जि. बुलडाणा*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *सर्वसाधारण*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *अन्न प्रक्रिया (देवांश दाल मिल)*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *कॅनरा बँक, बुलढाणा शाखा*

- ***प्रकल्प खर्च (रु.):*** *१० लाख*

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** *४८ लक्ष*

- ***व्यवसायांतर्गत नोकरी उपलब्ध झालेल्या***
  ***संख्या***

### *थोडक्यात युनिटची माहिती:*

*सौ. स्नेहा दिनेश चव्हाण यांनी काही वर्षे डाळ उत्पादनाचा व्यवसाय केला, मात्र त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. हार न मानता त्यांनी जिल्हा उद्योग केंद्र, बुलढाणाच्या मदतीने महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजने अंतर्गत अर्ज करुन नवीन व्यवसायाची सुरुवात करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे युनिट "देवांश दालमिल" या उद्योगांला/ प्रकल्पासाठी रु. १० लाख रुपयांचे कर्ज कॅनरा बँक, बुलढाणा शाखा यांच्याकडून प्राप्त झाले. हे युनिट चना डाळ, तूर डाळ, उडीद डाळ इत्यादी स्थानिक पातळीवर उत्पादने तयार करते आणि त्याची नैसर्गिक चव आणि गुणवत्ता जपते. या उद्योग घटकाची उलाढाल दरमहा रु. ३-४ लाख इतकी होत आहे. एक स्वावलंबी आणि अभिमानी उद्योजक इतर ८ जणांना रोजगार देत आहे.*

*सौ. स्नेहा दिनेश चव्हाण म्हणतात की, मी जिल्हा उद्योग केंद्र, बुलढाणा अंतर्गत राबविन्यात येणाऱ्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वतःच्या पायावर उभे*

# मिनी डाल मील, वाशिम



- **उद्योजकाचे नाव आणि पत्ता :**
  श्रीम. उमाबाई बाळासाहेब देशमुख
  जिल्हा -वाशिम

- **उद्योजकाचा प्रवर्ग:** सर्वसाधारण

- **उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:**
  मिनी डाल मील

- **वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:**
  विदर्भ कोकण ग्रामीण बँक, वाशिम

- **प्रकल्प खर्च (रु.):** ०५ लाख

- **वार्षिक उलाढाल (रु.):** ०७ लाख

- **उद्योजकाने दिलेला रोजगार :** ०७

## थोडक्यात युनिटची माहिती:

श्रीमती उमाबाई बाळासाहेब देशमुख यांनी मागील ३ वर्ष आधी एग्रो प्रोसेसिंग गहू साफसफाईचा व्यवसाय केला परंतू मुबलक भांडवल उपलब्ध नसल्याकारणे लागनारी सर्व सामग्री त्यांना घेता आली नाही त्यामुळे अपेक्षित यश मिळाले नाही.

संधीच्या शोधात असताना महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मित कार्यक्रम या योजनेची माहिती त्यांना जिल्हा उद्योग केंद्र, वाशिम यांच्याकडून मिळाली. त्यांच्या मदतीने व्यवसायाकरिता जिल्हा उद्योग केंद्र, वाशिम येथे मुख्यमंत्री रोजगार निर्मित कार्यक्रम या योजनेत अर्ज केला. व विदर्भ कोकण ग्रामीण बँकेकडून त्यांचे रु. ५ लाख रुपये रक्कमेचे कर्ज मंजूर झाले. मुख्यमंत्री रोजगार निर्मित कार्यक्रमामुळे एक स्वावलंबी आणि अभिमानास्पद उद्योजक म्हणून त्यांना मान मिळाला तसेच इतर ७ व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देत आहे. श्रीमती उमाबाई म्हणाल्या की, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा आभारी आहे, ज्याने आमच्या सारख्या लोकांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचे काम केले आहे. तसेच लघु उद्योगांना चालना दिली आहे, ज्यामुळे आमच्या सारख्या लोकांना लघु उद्योगांना चालना देण्याबरोबरच स्वतः च्या पायावर उभे केले आहे.

# वेदीका इंडस्ट्रिज, यवतमाळ




- **उद्योजकाचे नाव आणि पत्ता :**
  श्रीमती स्नेहल किरण जांभुळे

- **उद्योजकाचा प्रवर्ग:** सर्वसाधारण

- **उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:**
  वेदिका इंडस्ट्रिज

- **वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:**
  स्टेट बँक ऑफ इंडिया

- **प्रकल्प खर्च (रु.):** ३८ लाख

- **वार्षिक उलाढाल (रु.):** ५० लक्ष

- **व्यवसायांतर्गत नोकरी उपलब्ध झालेल्या कर्मचाऱ्यांची संख्या:** २५

## थोडक्यात युनिटची माहिती:

श्रीमती. स्नेहल किरण जांभुळे या मागील ३ वर्षांपासुन मसाला उत्पादनाचा व्यवसाय करित होत्या, परंतु त्यांना त्यामार्फत मनाप्रमाणे यश मिळत नव्हते. त्यांनी हार न मानता उद्योग संचालनालयाच्या जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविल्या जाणाऱ्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) योजने अंतर्गत अर्ज करुन नवीन सुरुवात केली. सदर योजेनमार्फत त्यांना बँकेने रू. ३८ लक्ष कर्ज मंजूर केले व त्यातून श्रीमती स्नेहल किरण जांभुळे यांनी वेदीका इंडस्ट्रिज या उद्योग घटकाची सुरुवात केली. सद्य:स्थितीत सदर घटकामार्फत त्यांना रू. ४.५० लक्ष प्रति महिना प्रमाणे नफा होत असुन त्यांनी या व्यवसायांतर्गत १० महिलांना रोजगार सुध्दा प्रदान केलेला आहे.

श्रीमती स्नेहल किरण जांभुळे या म्हणतात की, शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) या योजनेच्या मदतीने मी आज माझ्या छोट्या घरगुती उद्योगास मोठ्या प्रमाणावर पुढे नेण्यास यशस्वी झालेली आहे.

# सिध्दिविनायक फूड प्रॉडक्ट्स ,यवतमाळ







- **उद्योजकाचे नाव आणि पत्ता :** श्रीमती. निलीमा चिंकुंतलवार

- **उद्योजकाचा प्रवर्ग:** सर्वसाधारण

- **उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:** सिध्दिविनायक फुड प्रॉडक्ट्स, पांढरकवडा

- **वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:** स्टेट बँक ऑफ इंडिया, पांढरकवडा

- **प्रकल्प खर्च (रु.):** ५० लाख

- **वार्षिक उलाढाल (रु.):** १०० लक्ष

- **व्यवसायांतर्गत नोकरी उपलब्ध झालेल्या कर्मचाऱ्यांची संख्या:** ३०

## थोडक्यात युनिटची माहिती:

श्रीमती निलीमा चिंकुंतलवार या मागील 2 वर्षांपासून वेगवेगळे व्यवसाय करित होत्या परंतू त्यात त्यांना मनाप्रमाणे यश मिळाले नव्हते. हार न मानता त्यांनी महाराष्ट्र शासनातर्फे राबविल्या जाणाऱ्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) योजने अंतर्गत अर्ज करुन नवीन सुरुवात केली. सदर योजेनेंतर्गत त्यांना स्टेट बँक ऑफ इंडिया, पांढरकवडा शाखेकडून ५० लाख रुपयांचे कर्ज मंजूर झाले. त्यातून श्रीमती. निलीमा चिंकुंतलवार यांनी "सिध्दिविनायक फुड प्रॉडक्ट्स" या उद्योग घटकाची सुरुवात केली. यामध्ये पोह्यांचा चिवडा तसेच विविध चविष्ट पदार्थांचे उत्पादन घेतले जाते. सद्य:स्थितीत सदर घटकामार्फत त्यांना रू. ८.५० लाख प्रति महिना प्रमाणे नफा होत असुन त्यांनी या अंतर्गत २० महिलांना रोजगार सुध्दा प्रदान केलेला आहे.

श्रीमती निलीमा चिंकुंतलवार या म्हणतात की, शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) या योजनेच्या मदतीने मी आज माझ्या छोट्या घरगुती उद्योगास मोठ्या प्रमाणावर पुढे नेण्यास यशस्वी झालेली आहे.

# मेसर्स. ए.जी मार्केटींग, यवतमाळ




- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :***
  *श्री. योगेश मनोहरलाल मुंदडा, यवतमाळ*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *सर्वसाधारण*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *मे. ए. जी मार्केटींग*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *युनियन बँक ऑफ इंडिया, यवतमाळ*


- ***प्रकल्प खर्च (रु.):*** *५० लाख*

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** *४ कोटी*

- ***व्यवसायांतर्गत नोकरी उपलब्ध झालेल्या कर्मचाऱ्यांची संख्या:*** *३५*

## *थोडक्यात युनिटची माहिती:*

*श्री. योगेश मुंदडा हे मागिल ३ वर्षांपासुन कोल्ड स्टोरेज चा व्यवसाय करित होते पण त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. हार न मानता त्यांनी नवीन सुरुवात करण्याचा प्रयत्न केला परंतू भांडवल कमी असल्याकारणे त्यांना ते शक्य झाले नाही. नवीन संधीच्या शोधात असताना त्यांना महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची माहिती जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ यांच्याकडून मिळाली व योजने अंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी त्यांनी अर्ज केला. त्यांचे ५० लाखांचे कर्ज युनियन बँक ऑफ इंडिया, यवतमाळ यांच्याकडून मंजूर झाले. त्यांचे हे ए.जी. मार्केटींग या युनिटची दरमहा उलाढाल ३५ लाख रुपये आहे. एक स्वावलंबी आणि अभिमानी उद्योजक आज ३५ लोकांना रोजगार देत आहे. श्री. योगेश म्हणतात की, यामुळे मी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वत:च्या पयावर उभे केले आहे.*



# उर्मिला फूड प्रोडक्टस, बीड



- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :***
  *श्रीमती. मीरा अमोल घोडके*
  *जि. बीड*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *एन. टी (बी)*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *उर्मिला फूड प्रोडक्ट्स*

***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
*स्टेट बँक ऑफ इंडिया*

- ***प्रकल्प खर्च (रु.):*** *२५ लाख*

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** *२४ लाख*

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार :*** *७*

## *थोडक्यात युनिटची माहिती:*

*श्रीमती. मीरा अमोल घोडके यांनी उर्मिला फूड प्रॉडक्टसचा या नावाने व्यवसाय केला होता. परंतू या व्यवसायात त्यांना मनाप्रमाणे यश मिळत नव्हते. म्हणून महाराष्ट्र शासनातर्फे राबविल्या जाणाऱ्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजने (सीएमईजीपी) अंतर्गत अर्ज करुन नवीन सुरुवात केली. सदर योजनेंतर्गत त्यांना बँकेने २५ लाख रुपयांचे कर्ज मंजूर करुन श्रीमती. मीरा अमोल घोडके यांनी "उर्मिला फुड प्रॉडक्ट्स" या घटकाची सुरुवात केली. सद्य:स्थितीत सदर घटकामार्फत त्यांना रू. २ लाख प्रति महिना प्रमाणे नफा होत असुन त्यांनी या अंतर्गत ७ महिलांना रोजगार सुध्दा प्रदान केलेला आहे.*

*श्रीमती. मीरा म्हणतात की, शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) या योजनेच्या मदतीने मी आज माझ्या छोट्या घरगुती उद्योगास मोठ्या प्रमाणावर पुढे नेण्यास यशस्वी झालेली आहे.*

# मॅन्युफॅक्चरींग ऑफ पीपी आणि लेनो बॅग्स, धाराशिव



- **उद्योजकाचे नाव आणि पत्त:**
  प्रशांत दत्तात्रय घाडगे

- **उद्योजकाचा प्रवर्ग:** सामान्य

- **उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:**
  मॅन्युफॅक्चरींग ऑफ पीपी आणि लेनो बॅग्स

- **वित्तपुरवठा केलेल्या बॅंकेचे नाव आणि शाखा:** बॅंक ऑफ महाराष्ट्र, धाराशिव

- **प्रकल्प खर्च (रु.):** 50 लाख

- **वार्षिक उलाढाल (रु.):** 40 हजार

- **उद्योजकाने दिलेला रोजगार:** 30

## थोडक्यात युनिटची माहिती:

श्री. प्रशांत दत्तात्रय घाडगे आधीपासूनच व्यवसाय करित होते, परंतु त्यांना त्यामार्फत मनाप्रमाणे यश मिळत नव्हते. त्यांनी हार न मानता उद्योग संचालनालयाच्या जिल्हा उद्योग केंद्र- धाराशिव मार्फत राबविल्या जाणाऱ्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) योजने अंतर्गत अर्ज करुन नवीन सुरुवात केली. सदर योजेनमार्फत त्यांना बॅंकेने रू. 12 लाख 50 हजार कर्ज मंजूर करुन श्री. प्रशांत दत्तात्रय घाडगे यांनी मॅन्युफॅक्चरींग ऑफ पीपी आणि लेनो बॅग्स या घटकाची सुरुवात केली. सद्य:स्थितीत सदर घटकामार्फत त्यांना रू. 6 लाख प्रति महिना प्रमाणे नफा होत असुन त्यांनी या अंतर्गत 30 लोकांना रोजगार सुध्दा प्रदान केलेला आहे.

श्री. प्रशांत दत्तात्रय घाडगे हे म्हणतात की, शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) या योजनेच्या मदतीने मी आज माझा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर पुढे नेण्यास यशस्वी झालेलो आहे.



# मिनी दाल मिल, छ. संभाजी नगर



- ***उद्योजकाचे नाव व पत्ता :***
  *श्रीम. पुजा अशोक कारके*

- ***उद्योगाचा प्रवर्ग:*** *अनुसूचित जाती*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *मिनी दाल मिल*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *भारतीय स्टेट बँक, एन२-,सिडको, औरंगाबाद*

- ***प्रकल्प किंमत (रु.):*** *१४ लाख*

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** *२० लाख*

- ***उद्योजकाने उद्योगाद्वारे उपलब्ध केलेला रोजगार :*** *१५*

## ***थोडक्यात युनिटची माहिती:***

*श्रीमती. पुजा अशोक कारके यांना स्वत:चा व्यवसाय करण्याची खूप इच्छा होती, परंतू भांडवल कमी असल्याकारणे त्यांना ते शक्य झाले नाही. संधीच्या शोधात असताना त्यांना महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची माहिती जिल्हा उद्योग केंद्र, छ. संभाजी नगर यांच्याकडून मिळाली व योजने अंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी त्यांनी अर्ज केला. त्यांचे १४ लाखांचे कर्ज स्टेट बँक ऑफ इंडिया, छ. संभाजी नगर यांच्याकडून मंजूर झाले. आणि त्यांनी त्यांचे स्वत:चे मिनी डाळ युनिट स्थापन केले. या युनिटची वार्षिक उलाढाल २० लाख रुपयांची आहे. एक स्वावलंबी आणि अभिमानी उद्योजक आज १५ लोकांना रोजगार देत आहे. श्रीमती. पुजा म्हणतात की, मी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वत:च्या पयावर उभे केले आहे.*

# रो फिल्टर प्लँट, जालना




- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :***
  *श्री. सचिन नागनाथराव मुंडे*
  *जिल्हा -जालना*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *एस.टी*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *वॉटर फिल्टर प्लँट*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *कॅनरा बँक, जालना*

- ***प्रकल्प खर्च (रु.):*** *०६ लाख*

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** *२४ लाख*

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार :*** *०२*

## *थोडक्यात युनिटची माहिती:*

*श्री. सचिन नागनाथराव मुंडे यांनी महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी अर्ज केला होता. ते आधीपासूनच वॉटर फिल्टर चा व्यवसाय करित होते पण भांडवल कमी प्रमाणात उपलब्ध असल्याकारणे ते व्यवसायाचा विस्तार करु शकत नव्हते. अर्ज केल्यानंतर त्यांचे ६ लाख रुपयांचे कर्ज कॅनरा, जालना शाखेकडून मंजूर झाले. व सध्या त्यांचे हे युनिट त्यांना दरमहा २ लाखांची उलाढाल करत आहे. एक स्वावलंबी आणि अभिमानी उद्योजक आज २ लोकांना रोजगार देत आहे. श्री सचिन म्हणतात की, मी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वत:च्या पयावर उभे केले आहे.*

# श्री ॲटो गॅरेज, जालना.




- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता*** :
  *श्री. अक्षय भगवान शिंदे*
  *जिल्हा -जालना*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *सर्वसाधारण*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *ऑटोमोबाईल रिपेर्स*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *युनियन बँक ऑफ इंडिया, जालना*

- ***प्रकल्प खर्च (रु.):*** *०५ लाख*

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** *२० लाख*

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार:*** *०२*

## *थोडक्यात युनिटची माहिती:*

*श्री. अक्षय भगवान शिंदे हे ऑटोमोबाईल रिपेरिंगचा व्यवसाय करीत होते. त्यांना त्यांचा व्यवसाय विस्तारित करण्यासाठी भांडवलाची गरज होती. त्यासाठी त्यांनी शासकीय योजनांची माहिती घेण्यास सुरुवात केली. जिल्हा उद्योग केंद्र, जालनाच्या मदतीने त्यांनी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेच्या अंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी अर्ज केला. युनियन बँक ऑफ इंडिया, रामनगर शाखेद्वारे त्यांना ५ लाख रुपयांचे कर्ज मंजूर झाले. सध्या त्यांचा हा उद्योग घटक दरमहा रु. १.७० लाखांची उलाढाल करत आहे.*

*एक स्वावलंबी आणि अभिमानी उद्योजक आज २ लोकांना रोजगार देत आहे. श्री अक्षय म्हणतात की, मी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वत:च्या पायावर उभे केले आहे.*

# काजू उत्पादन, पालघर



- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :***
  *श्रीमती. संचिता संतोष जनाथे*

- ***उद्योजकाची श्रेणी :*** *सर्वसाधारण महिला*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *काजू उत्पादन*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *बँक ऑफ महाराष्ट्रा, मनोर*

- ***प्रकल्प खर्च (रु.):*** *२६.३१ लाख*

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** *८० लाख*

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार :*** *२०*

## *थोडक्यात युनिटची माहिती:*

*मु. पो. जव्हार, मोखाडा तालुका हा विक्रमगडच्या जवळ आहे. या भागात काजूचा कच्चा माल खूप प्रमाणात उपलब्ध आहे. स्थानिक पातळीवर शेतकरी कच्चे काजू गुजरात राज्यात विकत आहेत. कोणीही त्यावर प्रक्रिया करत नाही. त्यांना या क्षेत्रात व्यवसाय करायचा होता. त्यामुळे त्यांनी सिंधुदुर्ग, रायगड मधील काजू प्रक्रिया उद्योगांना भेट दिली आणि प्रक्रिया समजूर घेतली. महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेच्या मदतीने नवीन सुरुवात करण्याचा प्रयत्न केला. योजने अंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी त्यांनी अर्ज केला आणि त्यांचे २६.३१ लाखांचे कर्ज बँक ऑफ महाराष्ट्र, मनोर शाखेकडून मंजूर झाले. सध्या त्यांचे हे युनिट त्यांना वार्षिक ८० लाखांची उलाढाल देत आहे. एक स्वावलंबी आणि अभिमानी उद्योजक आज इतर इच्छुक २० लोकांना रोजगार देत आहे. श्रीमती. संचिता म्हणतात की, मी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वत:च्या पयावर उभे केले आहे.*

# समोसा उत्पादन, पालघर



- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :***
  *श्री. धनेश अनंत माळी*
  *जिल्हा -जालना*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *सर्वसाधारण*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *समोसा उत्पादन*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:*** *सारस्वत बँक, पालघर*

- ***प्रकल्प खर्च (रु.):*** *५० लाख*

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** *१ कोटी ५० लाख*

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार :*** *२५*

### ***थोडक्यात युनिटची माहिती:***

*श्री. धनेश अनंत माळी म्हणजेच मी पहिल्या पिढीतील उद्योजक असून मी दुर्गम (सातपाटी), पालघर जिल्ह्यातील रहिवासी आहे. मला आधीपासूनच समोसा युनिटचे ज्ञान होते. मला या क्षेत्रातच माझा व्यवसाय विस्तारित करायचा होता. महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेच्या मदतीने मी हा व्यवसाय सुरु करण्याचा प्रयत्न केला. योजने अंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी मी अर्ज केला आणि माझे रुपये ५० लाखांचे कर्ज सारस्वत बँकेकडून मंजूर झाले. माझ्या या समोसा युनिटमुळे मी १.३० कोटींचा महसूल मिळवू शकलो आहे. एक स्वावलंबी आणि अभिमानी उद्योजक म्हणून आज मी इतर इच्छुक २० लोकांना रोजगार देत आहे. मी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वत:च्या पयावर उभे केले आहे.*



# पीव्हीसी पाईप उत्पादन, रत्नागिरी



- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :***
  *श्री. अमितकुमार चंद्रकांत मांडवकर*
  *गणेश नगर, मु.पो. पिंपरी खुर्द*
  *जिल्हा - रत्नागिरी*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *सर्वसाधारण*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *पीव्हीसी पाईप उत्पादन*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *बँक ऑफ महाराष्ट्र, चिपळून*

- ***प्रकल्प खर्च (रु.):*** *४८.९३ लाख*

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** *७५ लाख*

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार :*** *५०*

## *थोडक्यात युनिटची माहिती:*

*श्री. अमितकुमार चंद्रकांत मांडवकर हे मागील दोन वर्षांपासून बेराजगार होते. स्वत:चा व्यवसाय सुरु करण्यासाठी त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेच्या मदतीने नवीन व्यवसाय सुरु करण्याचा प्रयत्न केला. योजने अंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी त्यांनी अर्ज केला. त्यांचे ४८.९३ लाखांचे कर्ज बँक ऑफ महाराष्ट्र, चिपळून शाखेकडून मंजूर झाले. हे युनिट पिव्हीसी पाईप तयार करते. सध्या ह्या युनिटची वार्षिक उलाढाल ही ७५ लाखांची आहे. एक स्वावलंबी आणि अभिमानी उद्योजक आज इतर इच्छुक ५० लोकांना रोजगार देत आहे. श्री अमितकुमार म्हणतात की, मी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वत:च्या पयावर उभे केले आहे.*

# युनिट काजू/ चिरोंजी प्रक्रिया (सुका मेवा), रत्नागिरी



- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता:***
  *श्री. सौरभ अशोक सोंडकर*
  *जी२०४, मु.पो. तुळशी कॉंप्लेक्स फेझ २,*
  *जिल्हारत्नागिरी -*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *सर्वसाधारण*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *युनिट काजू/ चिरोंजी प्रक्रिया (वासुका मे)*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *बँक ऑफ महाराष्ट्रा, खेड, रत्नागिरी*

- ***प्रकल्प खर्च (रु.):*** *५० लाख*

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** *६० लाख*

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार :*** *५०*

## *थोडक्यात युनिटची माहिती:*

*श्री. सौरभ अशोक सोंडकर हे मागील ३ वर्षे ट्रेडिंगचा व्यवसाय करत होते, पण त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. हार न मानता त्यांनी नवीन सुरुवात करण्याचा प्रयत्न केला परंतु भांडवल कमी असल्याकारणे त्यांना ते शक्य झाले नाही. नवीन संधीच्या शोधात असताना त्यांना महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची माहिती जिल्हा उद्योग केंद्र, रत्नागिरी यांच्याकडून मिळाली व योजनेअंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी त्यांनी अर्ज केला. त्यांचे ५० लाखांचे कर्ज बँक ऑफ महाराष्ट्र, खेड शाखेकडून मंजूर झाले. सध्या ह्या युनिटची वार्षिक उलाढाल ही ६० लाखांची आहे. एक स्वावलंबी आणि अभिमानी उद्योजक आज ५० लोकांना रोजगार देत आहे. श्री सौरभ अशोक सोंडकर म्हणतात की, मी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वत:च्या पयावर उभे केले आहे.*

# श्री गणेश चोकोबाईट्स, सिंधुदुर्ग



- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :***
  सौ. ज्योती सुरज कोरगावकर
  मळगाव मुंबई गोवा महामार्ग, तासावंतवाडी ., जि . सिंधुदुर्ग –४१६५१०

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** सर्वसाधारण

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  चॉकोलेट उत्पादन,
  मेसर्स. श्री गणेश चॉकोबाईट्स

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  भारतीय स्टेट बँक, सावंतवाडी शाखा

- ***प्रकल्प खर्च (रु.):*** ३४ लाख

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** ४३.२० लक्ष

- ***व्यवसायांतर्गत नोकरी उपलब्ध झालेल्या कर्मचाऱ्यांची संख्या:*** १२

## थोडक्यात युनिटची माहिती:

सौ. ज्योती सुरज कोरगावकर यांनी त्यांच्या लग्नापूर्वी छंद म्हणून जोपासलेल्या चॉकलेट्स बनवण्याच्या हौसेचे रूपांतर महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत एका भव्य उद्योगामध्ये झाले. महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेच्या मदतीने योजने अंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी त्यांनी अर्ज केला आणि त्यांचे ३४ लाखांचे कर्ज भारतीय स्टेट बँक, सावंतवाडी शाखेकडून मंजूर झाले. त्यांनी श्री. गणेश चोकोबाईट्स या नावाने स्वत:चे चॉकलेट बनविण्याचे युनिट सुरु केले. यामध्ये डिझायनर चॉकलेट्स, चॉकलेट बुके अशी १७ ते १८ विविध प्रकारची उत्पादने बनवली जातात. या युनिटची दर महिना ३.५ लाख ते ३.७ लाखांदरम्यान उलाढाल होत आहे. एक स्वावलंबी आणि अभिमानी उद्योजक आज इतर इच्छुक १२ लोकांना रोजगार देत आहे. सौ. ज्योती म्हणतात की, मी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वत:च्या पयावर उभे केले आहे.

# रेडीमेड गारमेंट, ठाणे




- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता:***
  कु. ऐश्वर्या धापरे
  गाळा नं. ई १/ए, अस्मिता टेक्सटाईल, कोणगाव, भिवंडी-४२१३११

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** सर्वसाधारण

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  स्कॉन द डिझायनर

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  बँक ऑफ महाराष्ट्र, कांदिवली

- ***प्रकल्प खर्च (रु.):*** ५० लाख

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** ४५ लाख

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार:*** ५०

## थोडक्यात युनिटची माहिती:

स्कॉन द डिझायनर स्टुडिओच्या मालक कु. ऐश्वर्या धापरे या आधी एका प्रायवेट कंपनीमध्ये नोकरी करत होत्या. लहानपणापासूनच त्यांना स्वत:चा व्यवसाय करण्याची इच्छा होती. त्यांची आई फॅशन डिझायर असून त्यांचा मॅन्युफॅक्चरींगचा व्यवसाय आहे. त्यांच्या प्रेरणेने त्यांना त्यांच करियर सुद्धा व्यसयाय क्षेत्रात करायचे होते. त्यांना मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजने अंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्र बँकेकडून ५० लाख रुपयांचे कर्ज मिळाले. व त्यांनी स्वत:चे स्कॉन द डिझायनर या नावाने युनिट स्थापन केले.

स्कॉन द डिझायनर स्टुडिओमध्ये कुशल व अकुशल कामगारांच्या मदतीने कपड्यांचे उत्पादन घेतले जाते. अंदाजे ५० कामगार सध्या या युनिटमध्ये कार्यरत आहेत. स्कॉन द डिझायनर स्टुडिओने देशांतर्गत ब्रँडसाठी काम केले आहे. या युनिटची २०२३-२३ ची वार्षिक उलाढाल ही ४५ लाखांची आहे. कु. ऐश्वर्या म्हणतात की, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वत:च्या पयावर उभे केले आहे.

# आयुर्वेदिक -फूड व्यवसाय, मुंबई






- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :*** श्रीमती. सोनाली कोचरेकर
- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** सर्वसाधारण
- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:*** आयुर्वेदिक - फूड व्यवसाय

## थोडक्यात युनिटची माहिती:

फार्मास्युटिकल्सच्या क्षेत्रात, सोनाली कोचरेकर यांनी डेटा रिसर्च ॲनालिस्ट म्हणून स्वतःचे नाव कमावले आहे. आहारतज्ञ म्हणून काम करत असताना निरोगी पाककृतींबद्दलच्या तिच्या आवडीमुळे तिला समकालीन आहाराच्या ट्रेंडची विस्तृत समज मिळाली. त्यातून त्यांनी पौष्टिक पदार्थ उपलब्ध करून देण्यासाठी मॅन्युफॅक्चरिंग युनिट सुरू करण्याचा निर्णय घेतला.
त्या म्हणतात की, आम्ही गेल्या काही वर्षांमध्ये, आमच्या आरोग्यदायी उत्पादनांना नवीन पौष्टिक ट्रेंडसह अधोरेखित केले आहे आणि पारंपारिक अन्न प्रणाली आणि आयुर्वेद या दोन्हींचे फायदे एकत्रित केले आहेत. शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजने अंतर्गत त्यांना व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध झाले. त्यांच्या मतानुसार त्यांच्या आरोग्यदायी दृष्टिकोनामुळे त्यांना बाजरीचे बार, बाजरीचे लाडू आणि आता बाजरीच्या चकल्यांचे उत्पादन करणे व वाढविण्याची प्रेरण मिळाली.
त्यांच्या व्यवसायाचे "आरोग्यदायी अन्न निरोगी आहाराच्या बरोबरीचे आहे" हे ब्रीदवाक्य आहे. ज्यावर आपण लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, त्यांची इच्छा आहे की व्यक्तींनी त्यांच्या वस्तूंचा दैनंदिन जीवनात वापर करून निरोगी जीवनशैली जगावी. त्यांच्या व्यवसायाचे असे उद्दिष्ट आहे की, एक अशी परिसंस्था स्थापन करावी की, जी संपूर्ण देशभरातील जमाती, भटक्या जमाती आणि कुपोषित मुलांना त्यांच्या पोषणाकरिता आवश्यक अन्नपदार्थ पुरवण्यास सक्षम करेल.
आमच्या अत्यावश्यक तत्त्वांशी प्रामाणिक राहून, आम्ही यशाचा मार्ग मोकळा केला आणि मीडियाचे लक्ष वेधले. आमच्या निर्मात्याने "लाडूमहोत्सव" निमित्त वंचित महिलांना लाडू खाण्याचा सल्ला दिला आणि तो लेख मुंबईच्या लक्षदीप वृत्तपत्रात प्रकाशित झाला. मेट्रो इंडिया न्यूजने आमच्या संस्थापकांच्या महिलांना, विशेषतः महिला स्वयं-सहायता गटांच्या सक्षमीकरणाच्या सततच्या इच्छेची दखल घेतली.
अथर्व फाउंडेशनच्या "वुमन अचिव्हर्स अवॉर्ड २०२३" ने निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देण्यासाठी केलेल्या आमच्या प्रयत्नांना प्रेरणा दिली.
श्री भागवत कराड, केंद्रिय वित्त राज्यमंत्री यांच्या हस्ते त्यांना सर्वात वेगाने वाढणारी आहार निर्माती कंपनी म्हणून गौरवण्यात आले. त्यांची टीम आणि नेत्याच्या एकत्रित प्रयत्नांमुळे आम्हाला आमच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल २०२२ मध्ये आमही उद्योगिनी प्रतिष्ठान बिझनेस एक्सचेंज अवॉर्ड शोमध्ये मॅन्युफॅक्चरिंग स्टार पुरस्कार मिळू शकला. या सर्वांमुळे, सीईओ इनसाइट्स इंडियाने आम्हाला "टॉप १० फूड ब्रँड लीडर्स - २०२२" मध्ये स्थान दिले.

# फॅब्रिकेशन वर्क्स, भंडारा



- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :***
  *श्रीमती. जेता मानिकराव रंगारी*
  *मु. बेला, तालुका व जिल्हा-भंडारा*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *अनुसूचित जाती*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *फॅब्रिकेशन वर्क्स*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *बँक ऑफ बडोदा, बेला, तालुका व जिल्हा भंडारा*

- ***प्रकल्प खर्च :(.रु)*** *१० लाख*

- ***वार्षिक उलाढाल :(.रु)*** *१७ लाख ७५ हजार*

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार*** *:०६*

## *थोडक्यात युनिटची माहिती:*

*श्रीमती जेता माणिकराव रंगारी या फॅब्रिकेशन वर्क्सचा उदयोग चालवित होत्या परंतू त्यांना पाहीजे तसे यश मिळत नव्हते. परंतू अपयशामुळे खचून न जाता त्यांनी नव्या जोमाने नविन सुरवात करण्याचे धाडस केले व महाराष्ट्र शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत व्यवसायासाठी कर्ज मिळविण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र, भंडारा यांचेकडे अर्ज केला. रू. १० लाख रुपयांचे प्रकल्प अहवाल सादर करून त्यांचे कर्ज प्रकरण बँकेकडे शिफारस करण्यात आले. आणि बँक ऑफ बडोदातर्फे त्यांचे कर्ज मंजूर झाले. त्यांची उत्पादनेही फारच नाविन्यपुर्ण व दर्जेदार आहेत. यात ग्रील्स, खिडक्या, दरवाजे, तावदाने व इतर वस्तुंचा समावेश आहे. त्यांच्या वैशिष्टयपुर्ण कामामुळे त्यांचा उदयोग घटक स्थानिक पातळीवर प्रसिद्ध आहे. पारंपारिक कलात्मक शैलीमुळे त्यांच्या उत्पादनांची मागणी वाढत आहे. त्यांच्या उद्योग घटकाची सद्यस्थितित उलाढाल रु. १.५ लाख प्रति महीना आहे. स्वः निर्भर उदयोजक श्रीमती जेता माणिकराव रंगारी यांनी त्यांचे उपक्रमात इतर ६ लोकांना रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे. आणि याचा त्यांना फार अभिमान आहे. त्यांच्या उदयोगाची प्रगती बघता त्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचे आभार मानतात त्यामुळे त्यांच्या सारखी उदयोजिका घडू शकली व स्वत:ला आत्मनिर्भर बनवून इतरांनाही रोजगार उपलब्ध करून देऊ शकली. असेच सुक्ष्म व लघु उदयोगांना चालना देऊन नविन होतकरू उदयोजक घडू शकतात असे मत त्यांनी व्यक्त केले.*

# न्यु मॉडर्न जेन्ट्स पार्लर, गडचिरोली




- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :***
  श्री. केतन डी. पालीकोंडवार
  जिल्हा -गडचिरोली

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** ओबीसी

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  केस कापने- सेवा

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  विदर्भ कोकण ग्रामीण बँक, कुनघाडा शाखा

- ***प्रकल्प खर्च (रु.):*** १.८० लाख

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** ३.६० लाख

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार :*** ०२

## ***थोडक्यात युनिटची माहिती:***

*मी श्री. केतन दामोदर पालीकोंडावार काही महिने जेन्ट्स पार्लर चा व्यवसाय करत होतो, परंतू माझ्याकडे भांडवल कमी उपलब्ध असल्यामुळे मला लागणारे प्रोडक्ट्स व यंत्र सामग्री मी पूर्णपणे खरेदी करु शकलो. त्यामुळे मला यामध्ये पाहिजे तेवढा नफा होत नव्हता व हवे तसे यश मिळविण्यासाठी मला पुन्हा एकदा नव्याने सर्व सामग्री सह माझा हा व्यवसाय सुरू करावयाचा होता. संधीच्या शाधात असताना मला जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली याच्याकडून महाराष्ट्र शासनातर्फे राबविल्या जाणाऱ्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजने अंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी अर्ज केला व विदर्भ कोकण ग्रामीण बँक, कुनघाडा शाखेकडून माझे १ लाख ८० हजारांचे कर्ज मंजूर झाले. सध्या हे युनिट मला दरमहा ३० हजारांचा नफा देत आहे. व या व्यवसायांतर्गत अजून २ लोकांना मी नोकरी उपलब्ध करु शकलो याचा मला आनंद आहे. या सगळयासाठीच मी जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली आणि सीएमईजीपी योजनेचा आभारी आहे.*

# बांबु हस्तकला, चंद्रपुर



## थोडक्यात युनिटची माहिती:

श्री. गणेश पेंदाम हे मु. मोहर्ली, जि. चंद्रपूर येथील रहीवासी आहेत. मोहर्ली हे गाव ताडोबा प्रकल्पाजवळ वसलेले आहे त्यामुळे इथे पर्यटकांची फार वर्दळ असते. त्यांच्याजवळ बांबू हस्तकलेच कौशल्य होत आणि पर्यटकांची वर्दळ असल्यामुळे बाजारपेठेचाही प्रश्न नव्हता. फक्त प्रश्न होता तो आर्थिक सहाय्याचा आणि तो आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी मदतीचा हात ठरली ती मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेनुसार वित्तीय संस्थेअंतर्गत रू. १ लाखांचे कर्ज बँक ऑफ इंडीया, पदमापूर शाखेकडून घेतले व स्वत:च्या कलेला दुजोरा देत एक छोटासा उद्योग स्थापन करुन त्यात 2 लोकांना रोजगारही पुरवला आणि आज यशस्वीपणे व्यवसाय सुरू आहे. व याचे श्रेय श्री. गणेश हे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेला देत आहेत.

- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :***
  *श्री. गणेश पेंदाम*
  *मु. मोहर्ली, जि. चंद्रपूर*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *सामान्य*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *बांबु हस्तकला*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *बँक ऑफ इंडिया, पदमापुर शाखा*

- ***प्रकल्प खर्च (रु.):*** *१ लाख*

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार :*** *०२*



*श्री. गणेश पेंदाम*

# नेट कॅफे, गडचिरोली



- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :***
  *कु. प्रिती रुपेश आलाम*
  *मु. नवेगाव, पो. मुडझा, त. जि. गडचिरोली.*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *अनुसूचित जमाती*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *नेट कॅफे (कम्प्युटर सर्विस)*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *स्टेट बँक ऑफ इंडिया, नवेगाव शाखा*

- ***प्रकल्प खर्च:*** *(रू.) ७ लाख*

- ***वार्षिक उलाढाल:*** *(रू.) ३.५० लाख*

## ***थोडक्यात युनिटची माहिती:***

*कु. प्रिती आलाम यांनी नेट कॅफेचा व्यवसाय करण्याचे ठरवले. आणि त्यासाठी त्यांना भांडवलाची आवश्यकता होती म्हणून त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजने अंतर्गत जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली यांचेकडे कर्ज मिळविण्यासाठी अर्ज केला व त्यांचे रू. ७ लाखांचे कर्ज स्टेट बँक ऑफ इंडिया, नवेगाव शाखेकडून मंजूर झाले. व सध्या व्यवसायाची वार्षिक उलाढाल ही रू. ३.५ लाखांची आहे. नेट कॅफेमुळे तिथल्या लोकांसाठी ऑनलाईन प्रणाली सुलभ झाली आहे.*

*राज्य सरकारच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेतून मिळालेले अनुदान आणि बँकेकडून मिळालेल्या कर्जामुळे त्यांचा व्यवसाय आज सुलभरित्या चालू आहे. आणि त्यासाठी त्यांनी योजना व शासनाप्रती आभार व्यक्त केले.*

# श्री. पॅकेजिंग, गोंदिया



- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :***
  श्री. राहूल भूटे
  जिल्हा -जालना

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** सर्वसाधारण

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  श्री. पॅकेजिंग

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  कॅनरा बँक, गोंदिया

- ***प्रकल्प खर्च (रु.):*** २३ लाख

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** ७६ लाख

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार :*** २०

## थोडक्यात युनिटची माहिती:

श्री रोहित भुते यांनी उत्पादन क्षेत्रात ८ वर्षे नोकरी केली आणि त्यांना याच क्षेत्रात उद्योजक व्हायचे होते. परंतू आर्थिक पाठबळ मिळत नव्हते त्याच वेळी संधीच्या शोधात असताना महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मित कार्यक्रम योजनेची माहिती त्यांना जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया यांच्याकडून मिळाली. त्यांच्या मदतीने त्यांच्या बॉक्स मॅन्युफॅक्चरिंग व्यवसायाकरिता जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया येथे सीएमईजीपी या योजनेत अर्ज केला. व कॅनरा बँकेकडून त्यांना रु. २३ लाख रक्कमेचे कर्ज मंजूर झाले. व्यवसाय चालू झाल्या नंतर त्यांची आता दरमहा ७ लाख रुपयांची उलाढाल होत आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मित कार्यक्रमामुळे एक स्वावलंबी आणि अभिमानास्पद उद्योजक म्हणून त्यांना मान मिळाला तसेच ते इतर २० व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देत आहेत. श्री रोहित भुटे म्हणाले की, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा मी आभारी आहे, ज्याने आमच्या सारख्या लोकांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचे काम केले आहे. तसेच लघु उद्योगांना चालना दिली आहे,

# बालाजी राईस, गोंदिया



- **उद्योजकाचे नाव आणि पत्ता :**
  श्रीमती. दिपिका आदेश देवरे
  जिल्हा -गोंदिया

- **उद्योजकाचा प्रवर्ग:** सर्व साधारण

- **उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:**
  बालाजी राईस

- **वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:**
  स्टेट बँक ऑफ इंडिया, तिरोरा शाखा, गोंदिया

- **प्रकल्प खर्च (रु.):** ५० लाख

- **वार्षिक उलाढाल (रु.):** ४७.५९ लाख

- **उद्योजकाने दिलेला रोजगार:** ५०

## थोडक्यात युनिटची माहिती:

नमस्कार। मी दीपिका आदेश देवरे दोन वर्षे मी राईस मिलचा व्यवसाय केला पण भांडवल अपुरे असले कारणाने मला अपेक्षित यश मिळाले नाही. तरी हार न मानता मी महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेच्या मदतीने नव्याने व्यवसायात सुरुवात करण्याचा प्रयत्न केला. संधीच्या शोधात असताना मला महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची माहिती जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया यांच्याकडून मिळाली व योजने अंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी मी अर्ज केला. माझे ५० लाखांचे कर्ज इंडियन ओवरसिज बँकेद्वारे मंजूर झाले. व मी माझे डायनामॅक्स इंजिनिअरिंग या नावे स्वत:चे राईस मील युनिट स्थापन केले. व पुन्हा माझा व्यवसाय नव्या जोमाने सुरू केला. सध्या माझी प्रतिमाह उलाढाल ३.९६ लाखांची आहे. आज मी एक समाधानी उद्योजक असून मी इतर ५० लोकांना माझ्या व्यवसायांतर्गत रोजगार देऊ शकले याचा मला खूप आनंद होत आहे. यासाठी मी जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेची आभारी आहे.

# चहा आणि नाश्ता, नागपुर




- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :***
  *कु. प्रियाली रमेश पौनीकर*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *सामान्य*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *चहा आणि नाश्ता*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *बँक ऑफ बडोदा, माने वाडा*

- ***प्रकल्प खर्च (रु.):*** *८ लाख ५० हजार*

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** *९ लाख ६० हजार*

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार :*** *०२*

## *थोडक्यात युनिटची माहिती:*

*कु. प्रियाली रमेश पौनीकर शैक्षणिक समुपदेशक तसेच इंटेरिअर डिझायनर सहाय्यक म्हणून कार्यरत होत्या. त्यांना या कामात यश मिळत नव्हते. तसेच त्यांची स्वत:चा व्यवसाय करण्याची इच्छा होती. स्वत:चे युनिट बनवण्याचे स्वप्नपूर्ण करण्यासाठी विविध योजनांची माहिती घेत होत्या त्यावेळी महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची माहिती जिल्हा उद्योग केंद्र, नागपुर यांच्याकडून मिळाली व कर्ज मिळविण्यासाठी या योजने अंतर्गत त्यांनी अर्ज केला. योजने अंतर्गत त्यांना बँक ऑफ बडोदा यांच्या मदतीने व्यवसाय सुरू करण्यासाठी रु.८.५ लाखांची आर्थिक मदत कर्जाच्या रुपाने मिळाली. व यातून त्यांनी स्वत:चे चहा व नाश्ताचे "आश्विनी अमृततुल्य" या नावे युनिट सुरु केले व लोकांनीसुद्धा त्यांच्या पदार्थांना फारच पसंती दिली आहे. सध्या त्यांच्या युनिटची मासिक उलाढाल रू. ७५ हजारांची आहे आणि व्यवसायाअंतर्गत त्यांनी २ लोकांना रोजगार उपलब्ध करुन दिला आहे. कु. प्रियाली म्हणाल्या की, आमचे स्वप्न यशस्वी करण्यासाठी मदत केल्याबद्दल आम्ही मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना आणि जिल्हा उद्योग केंद्र, नागपुर यांचे आभारी आहोत.*

# लाकूड आणि धातू कलाकृती उत्पादन, नागपुर



- **उद्योजकाचे नाव आणि पत्ता :**
  श्री. श्रेयस विपिन काकडे
  जिल्हा -नागपुर

- **उद्योजकाचा प्रवर्ग:** ओ.बी.सी

- **उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:**
  लाकूड आणि धातू कलाकृती उत्पादन

- **वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:**
  बँक ऑफ बरोडा, हिंगना बँच

- **प्रकल्प खर्च (रु.):** ३० लाख

- **वार्षिक उलाढाल (रु.):** ८० लाख

- **उद्योजकाने दिलेला रोजगार :** १४

## थोडक्यात युनिटची माहिती:

श्री. श्रेयस विपिन काकडे हे अभियांत्रिकी पार्श्वभूमी असलेले व्यक्ती आहेत ज्यांना तांत्रिक क्षेत्रात काम करायला आवडते. त्यांना लाकूड व धातूच्या हस्तकलेची उत्पादने बनविण्याची आवड होती. त्यांची स्वत:चे युनिट स्थापन करण्याची इच्छा होती. महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेची माहिती त्यांना जिल्हा उद्योग केंद्र, नागपुर यांच्याकडून मिळाली. त्यांच्या मदतीने त्यांनी या व्यवसायाकरिता जिल्हा उद्योग केंद्र, नागपुर येथे योजने अंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी अर्ज केला. व बँक ऑफ बडोदा, हिंगणा, नागपुर शाखेकडून त्यांचे रु. ३० लाख रुपये रक्कमेचे कर्ज मंजूर झाले. हा व्यवसाय सध्या दरमहा ७ लाख रुपयांची उलाढाल करत आहे. हे युनिट लाकूड व धातूंनी बनविलेल्या सजावटींच्या वस्तूंसाठी प्रसिद्ध आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मित कार्यक्रम योजनेमुळे एक स्वावलंबी आणि अभिमानास्पद उद्योजक म्हणून त्यांना मान मिळाला तसेच ते आज इतर १४ व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देत आहे. श्री. श्रेयस विपिन काकडे म्हणाले की, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा मी आभारी आहे, ज्याने आमच्या सारख्या लोकांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचे काम केले आहे. तसेच लघु उद्योगांना चालना दिली आहे, ज्यामुळे आमच्या सारख्या लोकांना लघु उद्योगांना चालना देण्या बरोबरच स्वत: च्या पायावर उभे केले आहे.

# बेस्ट बिल्डिंग सोल्युशन, वर्धा



- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता:***
  *श्री. सानिका संदीप चिलवलवार*
  *जिल्हा -वर्धा*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *महिला (सर्वसाधारण)*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *बेस्ट बिल्डिंग सोल्युशन*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *बँक ऑफ बरोदा, वर्धा*

- ***प्रकल्प खर्च (रु.):*** *४७.४६ लाख*

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** *४५ लाख*

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार:*** *१०*

## *थोडक्यात युनिटची माहिती:*

*श्रीमती. सानिका संदीप चिलवलवार, यांनी नेहमीच एक यशस्वी महिला उद्योजिका बनून इतर महिलांना स्थिर उत्पन्न मिळविण्यासाठी मदत करत आर्थिकदृष्या स्वतंत्र होण्याचे स्वप्न पाहिले होते. स्वतंत्र व्यवसायाच्या संधीच्या शोधात असताना महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मित कार्यक्रम या योजनेची माहिती त्यांना जिल्हा उद्योग केंद्र, वर्धा यांच्याकडून मिळाली. त्यांच्या मदतीने व्यवसायाकरिता जिल्हा उद्योग केंद्र, वर्धा येथे योजने अंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी त्यांनी अर्ज केला. व बँक ऑफ बडोदा, वर्धा शाखेकडून त्यांचे रु. ४७ लाख ४६ हजार रुपये रक्कमेचे कर्ज मंजूर झाले. त्यांच्या युनिटचे नाव बेस्ट बिल्डिंग सोल्युशन हे आहे. व्यवसायाचे मुळ उत्पादन हे पेव्हर ब्लॉक्स बनविण्याचे आहे जे की स्थानिक पातळीवर करण्यात येत आहे. व्यवसाय चालू झाल्यानंतर त्यांची दरमहा ३ लाख ७५ हजार रुपयांची उलाढाल होत आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमामुळे एक स्वावलंबी आणि अभिमानास्पद उद्योजक म्हणून त्यांना मान मिळाला आहे. तसेच आज ते इतर १० व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देत आहे. श्रीमती सानिका संदीप चिलवलवार म्हणाल्या की, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची मी आभारी आहे, ज्याने आमच्या सारख्या लोकांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचे काम केले आहे. तसेच लघु उद्योगांना चालना दिली आहे, ज्यामुळे आमच्या सारख्या लोकांना लघु उद्योगांना चालना देण्या बरोबरच स्वत: च्या पायावर उभे केले आहे.*

****त्यांची यशोगाथा YouTube वर बघा -***

*https://www.youtube.com/watch?v=t_sqnCY_j6E*

# बायोमास ब्रिकेट्स, वर्धा



- ***व्यावसायिकाचे नाव व पत्ता:***
  *श्री.सुभाष आत्माराम पाखरे*
  *हिंदुस्थान कॉलनी, पुलगाव, जि .वर्धा*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *अनुसूचित जाती*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *बायोमास ब्रिकेट्स*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *स्टेट बँक ऑफ इंडिया, पुलगाव*

- ***प्रकल्प किंमत (रु.):*** *४०,००,००० /-*

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** *१,३३,००,००० /-*

- ***रोजगार निर्मिती:*** *१०*

## *थोडक्यात युनिटची माहिती:*

*श्री सुभाष आत्माराम पाखरे हे १० वर्षे मुंबईत स्थित एका नामांकित कंपनीत काम करत होते परंतु त्याना नेहमीच स्वत:चा पर्यावरणपूरक व्यवसाय सुरु करायची इच्छा होती. संधीच्या शोधात असताना त्यांना महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मित कार्यक्रम योजनेची माहिती जिल्हा उद्योग केंद्र, वर्धा यांच्याकडून मिळाली. त्यांच्या मदतीने बायोमास ब्रिकेट्स विक्री व्यवसायाकरिता जिल्हा उद्योग केंद्र, लातूर येथे योजने अंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी त्यांनी अर्ज केला. व बँक ऑफ इंडिया, पुलगाव शाखेकडून त्यांचे रु. ४० लाख रक्कमेचे कर्ज मंजूर झाले. हा व्यवसाय दरमहा ११ लाख रुपयांची उलाढाल करत आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मित कार्यक्रमामुळे एक स्वावलंबी आणि अभिमानास्पद उद्योजक म्हणून त्यांना मान मिळाला तसेच ते इतर १० व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देत आहेत. श्री. सुभाष आत्माराम पाखरे म्हणाले की, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा मी आभारी आहे, ज्याने आमच्या सारख्या लोकांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचे काम केले आहे. तसेच लघु उद्योगांना चालना दिली आहे, ज्यामुळे आमच्या सारख्या लोकांना लघु उद्योगांना चालना देण्याबरोबरच स्वत: च्या पायावर उभे केले आहे.*

# एस. डी. इंडस्ट्रिज, हिंगोली



- ***व्यावसायिकाचे नाव व पत्ता:***
  *सौ. शोभा दिपक धूत*
  *जि- हिंगोली*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:***
  *सर्वसाधारण (महिला)*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *रंगीत पत्रा निर्मिती उद्योग*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *बँक ऑफ बरोदा, हिंगोली*

- ***प्रकल्प किंमत (रु.):*** *५० लाख*

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** *५ कोटी*

- ***रोजगार निर्मिती:*** *२०*

## ***थोडक्यात युनिटची माहिती:***

*सौ. शोभा दिपक धूत, मु.पोस्ट लिंबाळा ता- हिंगोली, जिल्हा-हिंगोली यांनी उद्योग संचालनालय, मुंबई ( महाराष्ट्र शासन) यांच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मित कार्यक्रम योजनेच्या मदतीने कोटेड पत्रा निर्मिती व्यवसायाकरिता जिल्हा उद्योग केंद्र, हिंगोली येथे कर्ज मिळविण्यासाठी अर्ज केला. बँक ऑफ बडोदा, हिंगोली या शाखेतून त्यांना रू. ५० लाख रक्कमेचे कर्ज मंजूर झाले. तसेच रक्कम रू. १७.५० लाख रुपयांचे अनुदान मिळाले व्यवसाय चालू झाल्या नंतर त्यांची दरमहा ४० लाख रुपयांची उलाढाल होत आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मित कार्यक्रम योजनेमुळे एकस्वावलंबी उद्योजक म्हणून त्यांना मान मिळाला तसेच त्या इतर २० व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देत आहे. सौ. शोभा दिपक धूत म्हणाल्या की, मी मुख्यमंत्री रोजगार निर्मित कार्यक्रम योजनेची आभारी आहे, ज्यानी आमच्या सारख्या लोकांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचे काम केले आहे. तसेच लघु उद्योगांना चालना दिली आहे, ज्यामुळे आमच्या सारख्या लोकांना लघु उद्योगांना चालना देण्याबरोबरच स्वत: च्या पायावर उभे केले आहे.*

# श्री. साई गृह उद्योग, परभणी



- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता:***
  *आश्विनी मंगेश शिवणकर*
  *जिल्हा –परभणी*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *सामान्य*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *श्री. साई गृह उद्योग*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *बँक ऑफ बरोदा, शेलू*

- ***प्रकल्प खर्च (रु.):*** *50 लाख*

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** *30 लाख*

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार:*** *50*

## *थोडक्यात युनिटची माहिती:*

*नमस्कार। मी आश्विनी मंगेश शिवणकर. मी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेच्या मदतीने व जिल्हा उद्योग केंद्र, परभणी यांच्या सहकार्याने माझा श्री. साई गृह उद्योग हा व्यवसाय सुरु केला. माझे रू. १७.५० लाखांचे कर्ज बँक ऑफ बडोदाद्वारे मंजूर झाले. सध्या माझे युनिट मला प्रति महिना रू. ३० लाखांची उलाढाल करत आहे. आज मी एक समाधानी उद्योजक असून मी इतर ३० लोकांना माझ्या व्यवसायांतर्गत रोजगार देऊ शकले याचा मला खूप आनंद होत आहे. यासाठी मी जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापुर तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेची आभारी आहे.*

# रुद्र क्रिएशन, नांदेड



- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :***
  *सौ. सुलभा अजय रुद्रावार*
  ***जिल्हा** -नांदेड*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:** सर्वसाधारण (महिला)*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *रुद्र क्रिएशन, नांदेड (गृह सजावटीची उत्पादने)*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *बँक ऑफ बडोदा, नांदेड*

- ***प्रकल्प खर्च (रु.):** ५० लाख*

- ***वार्षिक उलाढाल (रु.):** ७५ लाख*

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार :** १३*

***थोडक्यात युनिटची माहिती:***

*सौ. सुलभा अजय रुद्रावार या गृह सजावटीचा व्यवसाय करित होत्या. स्वतःचे युनिट असणे हे त्यांचे स्वप्न होते. स्वतःचे युनिट बनवण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी विविध योजनांची माहिती घेत होत्या त्यावेळी महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची माहिती जिल्हा उद्योग केंद्र, धुळे यांच्याकडून मिळाली व कर्ज मिळविण्यासाठी या योजने अंतर्गत त्यांनी अर्ज केला. योजने अंतर्गत त्यांना बँक ऑफ बडोदा यांच्या मदतीने व्यवसाय सुरू करण्यासाठी रु. ५० लाखांची आर्थिक मदत कर्जाच्या रुपाने मिळाली. वॉल पेपर, कोरीव दरवाजे, ग्लास इंचिंग, कार व वॉल हँग पेंटिंग्स ही त्यांची प्रसिद्ध उत्पादने आहेत. व या उत्पादनांना लोकांनी खरेदी करुन पसंती दाखवली आहे. सध्या त्यांचे हे युनिट रू. ७५ लाखांची वार्षिक उलाढाल करत आहे आणि सुरुवातीपासूनच १३ कामगार त्यांच्या कंपनीच्या वाढीसाठी कार्यरत आहेत. त्यांचे स्वप्न यशस्वी करण्यासाठी मदत केल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना आणि जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड यांचे आभार मानले आहेत.*

# पोहा उत्पादन, लातूर



## थोडक्यात युनिटची माहिती:

श्री दिनेश विठ्ठलराव जंगापल्ले, मु.पोस्ट साई, ता-लातूर, जिल्हा-लातूर हे मागील चार वर्षापासून कोणत्यातरी चांगल्या व्यवसायाची सुरवात करावी असा विचार करीत होते, त्याच वेळी महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मित कार्यक्रम या योजनेची माहिती त्यांना जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांच्याकडून मिळाली. त्यांच्या मदतीने त्यांनी महाराष्ट्रातील दैनंदिन आहारातील आवडीने खाणाऱ्या "पोहा" निर्मिती व्यवसायाकरिता जिल्हा उद्योग केंद्र, लातूर येथे मुख्यमंत्री रोजगार निर्मित कार्यक्रम योजनेत अर्ज केला. त्याच बरोबर भारतीय स्टेट बँक, चंद्रनगर, लातूर या शाखेतून त्यांना रु. १३,६८,०००/- रक्कमेचे कर्ज मंजूर झाले. व्यवसाय चालू झाल्या नंतर त्यांचे हे युनिट दरमहा ५०,०००/- रुपयांची उलाढाल करत आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मित कार्यक्रमामुळे एक स्वावलंबी उद्योजक म्हणून त्यांना मान मिळाला तसेच इतर ३ व्यक्तींना ते रोजगार उपलब्ध करून देत आहेत. दिनेश विठ्ठलराव जंगपल्ले म्हणाले की, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा मी आभारी आहे, ज्याने आमच्या सारख्या लोकांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचे काम केले आहे. तसेच लघु उद्योगांना चालना दिली आहे.

- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :***
  *श्री. दिनेश विठ्ठलराव जंगापल्ले*
  *मु. साई, ता. लातूर, जिल्हा -लातूर*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *अनुसूचित जाती*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *पोहा उत्पादन*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा- लातूर*

- ***प्रकल्प खर्च (रु.):*** *१३.६८ लाख*

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** *06 लाख*

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार :*** *03*

# मेसर्स. विद्या ॲग्रो फूड प्रोसेसिंग, धुळे



- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :***
  सौ. वर्षा पाटील
  जिल्हा-धुळे

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** ओ.बी.सी

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  मेसर्स विद्या ॲग्रो फूड प्रोसेसिंग

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  युनियन बँक ऑफ इंडिया, दोंडाईचा

- ***प्रकल्प खर्च (रु.):*** ४९,३०,०००/-


- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** ८,००,०००/-

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार :*** ८

## थोडक्यात युनिटची माहिती:

मी सौ.वर्षा कुणाल पाटील पोस्ट ग्रॅज्युएट आहे. माझे स्वतःचे व्यावसायिक युनिट असणे हे माझे स्वप्न होते. त्यामुळे मी खाजगी संस्थेत प्रशिक्षण घेतले आणि बाभळे येथे विद्या ॲग्रो फूड प्रोसेसिंग या फर्मची स्थापना केली. आम्ही माझे स्वतःचे युनिट बनवण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी विविध योजनांची माहिती घेत होतो त्यावेळी आम्हाला महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची माहिती जिल्हा उद्योग केंद्र, धुळे यांच्याकडून मिळाली व कर्ज मिळविण्यासाठी या योजने अंतर्गत आम्ही अर्ज केला. योजने अंतर्गत आम्हाला युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा दोंडाईचा यांच्या मदतीने व्यवसाय सुरू करण्यासाठी रु. ४९.३० लाखांची आर्थिक मदत कर्जाच्या रुपाने मिळाली. आम्ही बेसन (चनाबेसन) तयार करतो जो आज "खान्देश" ब्रँड म्हणून ओळखला जातो. युनिटची सध्याची मासिक उलाढाल ८-१० लाखांची आहे आणि सुरुवातीपासूनच ७-८ कामगार आमच्या कंपनीच्या वाढीसाठी आमच्यासोबत काम करत आहेत. आमचे स्वप्न यशस्वी करण्यासाठी मदत केल्याबद्दल आम्ही मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना आणि जिल्हा उद्योग केंद्र, धुळे यांचे आभारी आहोत.

# ड्रोन स्प्रे सर्विस- कृषी क्षेत्र, जळगाव






- **उद्योजकाचे नाव आणि पत्ता :**
  श्री. लोकेश पाटील
  जि. जळगाव

- **उद्योजकाचा प्रवर्ग:** ओ.बी.सी

- **उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:**
  ड्रोन स्प्रे सर्विस- कृषी क्षेत्र

- **वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:**
  सेंट्रल बँक ऑफ इंडिया, खानापुर

- **प्रकल्प खर्च (रु.):** १९,९४,१५८/-

- **वार्षिक उलाढाल (रु.):** १०,२४,०००/-

- **उद्योजकाने दिलेला रोजगार :** ५

## थोडक्यात युनिटची माहिती:

श्री. लोकेश नथ्थू पाटील हे अनेक दिवसांपासून व्यवसाय करण्याचा विचार करत होते, पण मुबलक भांडवल उपलब्ध नसल्यामुळे त्यांना ते शक्य होत नव्हते. नवीन संधीच्या शोधात असताना त्यांना महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची माहिती जिल्हा उद्योग केंद्र, जळगाव यांच्याकडून मिळाली व योजने अंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी त्यांनी अर्ज केला. त्याचे युनिट कृषी उद्योगाशी संबंधित आहे यासाठी त्यांना १९ लाख ९४ हजाराचे कर्ज सेंट्रल बँक ऑफ इंडिया, खानापूर शाखेतून मंजूर झाले. हे युनिट शेतकऱ्यांना खते/ कीटकनाशके/ कीटकनाशके फवारणीसाठी मदत करते. ड्रोनद्वारे ड्रोन ७ एकर जमीन एका तासात पूर्ण करते. हे मॅन्युअल पद्धतींपेक्षा ४-५ पट प्रभावी आहे. हे युनिट दरमहा रु. ९००००/- ची उलाढाल करत आहे. एक स्वावलंबी उद्योजक इतर ३ लोकांना रोजगार देत आहे. श्री लोकेश नथ्थू पाटील म्हणतात की, मी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा आभारी आहे ज्याने लघुउद्योगांना चालना देण्याबरोबरच आमच्यासारख्या लोकांना स्वत:च्या पायावर उभे केले आहे.

# बेकरी उत्पादन युनिट, जळगाव



- **उद्योजकाचे नाव आणि पत्ता :**
  श्रीम. प्रिती राजेंद्रा चौधरी
  जिल्हा -जळगाव

- **उद्योजकाचा प्रवर्ग:** महिला

- **उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:**
  बेकरी उत्पादन युनिट

- **वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:**
  बँक ऑफ बडोदा

- **प्रकल्प खर्च (रु.):** ५० लाख

- **वार्षिक उलाढाल (रु.):** ४८ लाख

- **उद्योजकाने दिलेला रोजगार :** ३०

## थोडक्यात युनिटची माहिती:

श्रीमती. प्रिती राजेंद्र चौधरी यांनी तीन वर्षे बेकरी पदार्थ बनविण्याचा व्यवसाय केला परंतू भांडवलाच्या कमतरतेमुळे व्यवसायाकरिता आवश्यक काही यंत्र सामग्री मला खरेदी करिता आले नाही त्यामुळ पूर्ण क्षमतेने व्यवसाय सुरु होऊ शकला नाही. परिणामी व्यवसायात बरेचसे अपयश आले. तरि हार न मानता मी जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती यांच्या मदतीने महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेच्या मदतीने नवीन व्यवसाय सुरु करण्यासाठी कर्ज मिळविण्यासाठी योजने अंतर्गत अर्ज केला. व बँक ऑफ बडोदा, जळगाव शाखेकडून माझे रू. ५० लाख रुपयांचे कर्ज मंजूर झाले.

हे युनिट दरमहा ४ लाखांची उलाढाल करत आहे. व आज मला सांगताना आनंद होता की, आज मी इच्छुक ३० लोकांना रोजगार देत आहे. यासाठी मी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वत:च्या पयावर उभे केले आहे.

# ॲल्युमिनियम सेक्शन वर्क, नंदुरबार



- **उद्योजकाचे नाव आणि पत्ता :**
  श्रीमती सुनिता मधुकर माळी
  मोठा माळीवाडा, धानोरा रोड मु. पो. नंदुरबार जि. नंदुरबार

- **उद्योजकाचा प्रवर्ग:** ओ. बी. सी

- **उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:**
  ॲल्युमिनियम सेक्शन वर्क

- **वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:**
  सेंट्रल बँक ऑफ इंडिया, नंदुरबार

- **प्रकल्प खर्च (रु.):** ०६ लाख ७७०० हजार

- **वार्षिक उलाढाल (रु.):** २४ लाख

- **व्यवसायांतर्गत नोकरी उपलब्ध झालेल्या कर्मचाऱ्यांची संख्या:** ७

## थोडक्यात युनिटची माहिती:

श्रीमती. सुनिता मधुकर माळी या एक सुशिक्षित गृहिणी असून त्या तांत्रिक क्षेत्रात स्वतःचा व्यवसाय करण्यास उत्सुक होत्या. त्यासाठी त्यांनी बाजारपेठ पहाणी करुन अॅल्युमिनिअम पासुन दरवाजे, खिडक्या, इत्यादी बनवण्याचा उदयोगास नंदुरबार मध्ये सुरुवात केली. भांडवलीची कमतराता असल्याने कर्जासाठी जिल्हा उदयोग केंद्र गाठले त्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र, नंदुरबार चे श्री उपेंद्र सांगळे सर व पाटील सरांनी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ह्या योजनेच्या लाभासाठी योग्य सल्ला देऊन मार्गदर्शन केले.
या प्रवासात श्री सांगळे सर व पाटील सरांच्या मार्गदर्शनासोबतच, युनियुन बॅक ऑफ इंडिया, बॅक ऑफ महाराष्ट्र तसेच सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या नंदुरबार शाखांमध्ये त्यांनी कर्जासाठी चौकशी केली परंतू नकार मिळाला त्यानंतर जिल्हा उदयोग केंद्राचे अधिकाऱ्यांनी सल्ला दिला व साथ दिली. प्रकल्प सादारीकरणा नंतर सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या नंदुरबार शाखा व्यवस्थापक श्री घोडसकर सरांनी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमा अंतर्गत कर्ज देण्यास होकार दिला. तो दिवस जीवनातील सर्वात मोठा आनंदाचा दिवस होता. बँकेने रू ६ लाख ७७०० हजार रुपयांचे कर्ज मंजूर केले. त्यानंतर यंत्र सामग्री मागवली आणि उदयोग आधार, शॉप अॅक्ट लायसन्स् इत्यादी परवाने मिळवुन उदयोगास सुरवात केली. ज्या भागात उदयोगास सुरवात केली आहे त्या परीसरात नवीन वस्ती निर्मिती घर बांधणीचे काम मोठया प्रमाणत सुरु आहे. त्यामुळे मागणी खुप आहे थोडा अपुरा भांडवल असल्याने उलाढाल जास्त करता येत नाही जास्त प्रमाणत खेळते भांडवल अडकुन जात असल्याने उलाढाल कमी होते. सध्या ७ कामगार कार्यरत आहेत.
मी या व्यवसायात समाधानी आहे. जेमतेम परिस्थिती असतांना बँकेने माझ्या सारख्या एका गृहिणीला ६ लाखाचे कर्ज उपलब्ध करुन दिले, माझ्यावर विश्वास दाखवला आणि दरम्यानच्या काळात अनुदानाची रक्कम सुध्दा आम्हाला मिळाली भविष्यात मोठया प्रमाणात निर्मिती उदयोग उभा करुन परीसरातील बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचा माझा मानस आहे.
जिल्हा उद्योग केंद्र, नंदुरबारचे महाव्यवस्थापक श्री सांगळे सर व व्यवस्थापक श्री दिलीप पाटील सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या नंदुरबारयांनी जो विश्वास दाखवला आणि मदत केली यासाठी त्यांचेही धन्यवाद. मी सदैव तुम्हा सर्वाचे ऋणी राहीण.

# सोया टोफू आणि फळांच्या रसांचे उत्पादन (पॅनियर), नाशिक




- **उद्योजकाचे नाव आणि पत्ता :**
  श्रीमती. सुवर्णा राहूल महाले

- **उद्योजकाचा प्रवर्ग:** ओ.बी.सी

- **उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:**
  सोया टोफू रसांचे उत्पादनआणि फळांच्या (पॅनियर)

- **वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:**
  युनियन बँक ऑफ इंडिया, नाशिक

- **प्रकल्प खर्च (रु.):** २२ लाख

- **वार्षिक उलाढाल (रु.):** ५.५० लाख

- **उद्योजकाने दिलेला रोजगार :** ५

## थोडक्यात युनिटची माहिती:

*श्रीमती सुवर्णा राहुल महाले या सुशिक्षित गृहिणी होत्या, त्यांचा अन्न क्षेत्रात स्वत:चा व्यवसाय करण्याचा मानस होता, प्रदीर्घ संशोधनानंतर त्यांनी नाशिक परिसरात सोया टोफू आणि फळांचे रस उत्पादन युनिट सुरु करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर त्यांनी श्री. विलास पवार सर (उद्योग निरिक्षक), जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक यांच्याशी संपर्क साधला आणि त्यांच्याकडून त्यांना मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेबद्दल भरीव मार्गदर्शन व सूचना मिळाल्या. आणि पवार सरांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचा नवीन व्यवसायासाठीचा प्रवास सुरु झाला. त्यांनी युनियन बँक ऑफ इंडिया, पवन नगर शाखा नाशिक यांच्यांशी संपर्क साधला, अनेक बैठका आणि प्रकल्प सादरीकरणानंतर श्री. वाघ सर शाखा व्यवस्थापक यांनी २२ लाखांच्या रक्कमेसाठी कर्ज मंजूर केले. त्यानंतर मशीन्स मागवल्या व सरकारी मशीन्स मिळाल्यावर काम सुरु झाले. सध्या 5 कामगार कार्यरत आहेत. आणि सोया टोफू आणि फ्रुट ज्यूससाठी परवाने उत्पादन सुरु केले आहे. कोविड-२०१९ महामारी आणि सगळीकडे लॉकडाऊन असूनही व्यवसाय चालू होता व प्रतिसाद देखील वाढत होता. उत्पादित साहित्य मुंबई, पुणे, नाशिक जिल्ह्यात निर्यात करण्यात आले. याशिवाय आमच्यावर विश्वास ठेवल्याबद्दल आणि प्रकल्पासाठी आम्हाला मदत केल्याबद्दल मी जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक मधील श्री. पवार सर आणि युनियन बँकेचे श्री वाघ सर यांची खूप खूप*

# डायनामॅक्स इंजिनिअरिंग, कोल्हापुर



- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता:***
  *श्रीम. पुजा सौरभ पाटील*
  *जिल्हा- कोल्हापुर*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *महिला*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *डायनामॅक्स इंजिनिअरिंग*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *इंडियन ओवरसिज बँक*

- ***प्रकल्प खर्च (रु.):*** *५० लाख*

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** *४८ लाख*

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार :*** *३०*

## ***थोडक्यात युनिटची माहिती:***

*नमस्कार। मी पूजा पाटील मागील दोन वर्षे मी रोटरी अॅक्टयुएटर बॉडी आणि असेंब्ली युनिटचा व्यवसाय केला, पण भांडवल अपुरे असले कारणाने मला अपेक्षित यश मिळाले नाही. महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेच्या मदतीने मी नवीन व्यवसाय सुरु करण्याचा प्रयत्न केला. नवीन संधीच्या शोधात असताना मला या योजनेची माहिती जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापुर यांच्याकडून मिळाली व योजने अंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी मी अर्ज केला. माझे ५० लाखांचे कर्ज इंडियन ओवरसिज बँकेद्वारे मंजूर झाले. व मी माझे डायनामँक्स इंजिनिअरिंग या नावे स्वत:चे युनिट स्थापन केले. सध्या माझे हे युनिट प्रति महिना २.५ लाखांची उलाढाल करत आहे. आज मी एक समाधानी उद्योजक असून मी इतर २१ लोकांना माझ्या व्यवसायांतर्गत रोजगार देऊ शकले याचा मला खूप आनंद होत आहे. यासाठी मी जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापुर तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेची आभारी आहे.*

# कवडे मशिन वर्क्स, कोल्हापुर



- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता :***
  *श्रीमती. श्रृती लटाने*
  *जिल्हा -कोल्हापुर*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:***सर्वसाधारण

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *कवडे मशिन वर्क्स*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *बँक ऑफ इंडिया*

- ***प्रकल्प खर्च (रु.): ४४*** *लाख*

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार :*** *१५*

## *थोडक्यात युनिटची माहिती:*

*नमस्कार। मी श्रृती लाटणे अनेक वर्षे पारंपारिक मशिन्सच्या सहाय्याने पुले (Pulley) बनवण्याचा व्यवसाय करते आहे. पण भांडवल अपुरे असले कारणाने मला अपेक्षित यश मिळाले नाही. नवीन संधीच्या शोधात असताना मला महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची माहिती जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापुर यांच्याकडून मिळाली व योजने अंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी त्यांनी अर्ज केला. माझे ४४ लाखांचे कर्ज बँक ऑफ इंडियाद्वारे मंजूर झाले. व मी पुन्हा माझा व्यवसाय नव्या जोमाने सुरू केला. सध्या माझे हे युनिट प्रति महिना ५ ते ६ लाखांची उलाढाल करत आहे. आज मी एक समाधानी उद्योजक असून मी इतर १५ लोकांना माझ्या व्यवसायांतर्गत रोजगार देऊ शकले याचा मला खूप आनंद होत आहे. यासाठी मी जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापुर तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेची आभारी आहे.*

# पी.जे. इंडस्ट्रिज, पुणे



- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता:***
  *श्री. प्रशांत रामदास जगताप*
  *जिल्हा -पुणे*

- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *एस सी*

- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *पी. जे. इंडस्ट्रिज*

- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *बँक ऑफ महाराष्ट्र*

- ***प्रकल्प खर्च (रु.):*** *३३ लाख*

- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** *५० लाख*

- ***उद्योजकाने दिलेला रोजगार :*** *१०*

## *थोडक्यात युनिटची माहिती:*

*श्री. प्रशांत जगताप, मी पहिल्या पिढीतील उद्योजक आहे. एमसीईडी, पुणे येथील प्रशिक्षणाच्या मदतीने माझी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेची ओळख झाली. या योजने अंतर्गत मी कर्ज मिळविण्यासाठी अर्ज केला व बँक ऑफ महाराष्ट्र, विमानगनगर शाखेद्वारे माझे ३३ लाखांचे कर्ज मंजूर झाले. हे कर्ज व्यवसाय सुरु करण्याच्या सुरुवातीच्या दिवसांमध्ये खूप उपयुक्त ठरले आहे. हा पैसा मोठया प्रमाणात कच्चा माल खरेदी करण्यासाठी आम्ही वापरला. आम्ही कापूस बियाण्यांवर प्रक्रिया करुन प्राण्यांचा चारा तयार करतो. कापूस बियाणे, तेल बियाणे हे व्यवसायातील मुख्य उत्पादन घटक आहेत. माझे हे युनिट दरमहा ४ लाखांची उलाढाल करत आहे. व आज मला सांगताना आनंद होता की, आज मी इच्छुक १० लोकांना रोजगार देत आहे. यासाठी मी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वत:च्या पयावर उभे केले आहे.*

# विटा निर्मिती व्यवसाय, सांगली



## थोडक्यात युनिटची माहिती:

श्री. इंद्रजीत बाबासाहेब पाटील यांनी मागील दोन वर्ष खाजगी क्षेत्रात सेवा केली, मात्र त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. हार न मानता त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेच्या मदतीने नवीन व्यवसाय सुरु करण्याचा प्रयत्न केला. योजने अंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी त्यांनी अर्ज केला. त्यांचे रू. ५० लाखांचे कर्ज बँक ऑफ इंडिया, माधवनगर शाखेकडून मंजूर झाले. व त्यांचे हे युनिट सध्या दरमहा रू.१६ लाखांची उलाढाल करत आहे. एक स्वावलंबी उद्योजक आज इतर इच्छुक २० लोकांना रोजगार देत आहे. श्री सुभाष कदम म्हणतात की, मी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वत:च्या पयावर उभे केले आहे.

- ***उद्योजकाचे नाव आणि पत्ता:***
  *श्री. इंद्रजित बाबासाहेब पाटिल*
  *जिल्हा -सांगली*
- ***उद्योजकाचा प्रवर्ग:*** *सर्वसाधारण*
- ***उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:***
  *विटा निर्मिती व्यवसाय*
- ***वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:***
  *युनियन बँक ऑफ इंडिया, माधवनगर*
- ***प्रकल्प खर्च (रु.):*** *५० लाख*
- ***वार्षिक उलाढाल (रु.):*** *१.९ करोड*
- ***उद्योजकाने दिलेला रोजगार :*** *२०*

# प्लॅस्टिक इंजेक्शन मॅन्युफॅक्चरिंग, सातारा



- **उद्योजकाचे नाव आणि पत्ता:** श्री. सुभाष कदम
- **उद्योजकाचा प्रवर्ग:** सर्वसाधारण
- **उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:** प्लॅस्टिक इंजेक्शन मॅन्युफॅक्चरिंग
- **वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:** बँक ऑफ इंडिया
- **प्रकल्प खर्च (रु.):** 50 लाख
- **व्यवसायांतर्गत नोकरी उपलब्ध झालेल्या कर्मचाऱ्यांची संख्या:** 8

## थोडक्यात युनिटची माहिती:

श्री. सुभाष कदम यांनी मागील चार वर्ष प्लॅस्टिक इंजेक्शन मोल्डिंग बनविण्याचा व्यवसाय केला, पण त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. हार न मानता त्यांनी नवीन सुरुवात करण्याचा प्रयत्न केला परंतू भांडवल कमी असल्याकारणे त्यांना ते शक्य झाले नाही. नवीन संधीच्या शोधात असताना त्यांना महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची माहिती जिल्हा उद्योग केंद्र, सातारा यांच्याकडून मिळाली व योजने अंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी त्यांनी अर्ज केला. त्यांचे ५० लाखांचे कर्ज बँक ऑफ इंडिया, ता. खंडाळा यांच्याकडून मंजूर झाले. व सध्या त्यांचे हे युनिट दरमहा ४ लाखांची उलाढाल करत आहे. एक स्वावलंबी उद्योजक आज ८ लोकांना रोजगार देत आहे. श्री सुभाष कदम म्हणतात की, मी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वत:च्या पयावर उभे केले आहे.

# बील्डमास्टर प्रायवेड लि., सोलापुर



- **उद्योजकाचे नाव आणि पत्ता :**
  श्री.कमलेश राजेंद्र पानसरे
  मु. कुर्डुवाडी, ता. माढा

- **उद्योजकाचा प्रवर्ग:** उत्पादन

- **उद्योगाचे/ व्यवसायाचे नाव:**
  बील्डमास्टर प्रायवेड लि.

- **वित्तपुरवठा केलेल्या बँकेचे नाव आणि शाखा:**
  स्टेट बँक ऑफ इंडिया, कुर्डुवाडी, ता. माढा

- **प्रकल्प खर्च (रु.):** ५० लाख

- **वार्षिक उलाढाल (रु.):** १.५ करोड

- **व्यवसायांतर्गत नोकरी उपलब्ध झालेल्या**

## थोडक्यात युनिटची माहिती:

श्री. कमलेश राजेंद्र पानसरे यांनी एक वर्ष एसीसी ब्लॉक बनविण्याचा व्यवसाय केला पण त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. हार न मानता त्यांनी नवीन सुरुवात करण्याचा प्रयत्न केला परंतु भांडवल कमी असल्याकारणे त्यांना ते शक्य झाले नाही. नवीन संधीच्या शोधात असताना त्यांना महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची माहिती जिल्हा उद्योग केंद्र, सोलापुर यांच्याकडून मिळाली व योजनेअंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी त्यांनी अर्ज केला. त्यांचे ५० लाखांचे कर्ज स्टेट बँक ऑफ इंडिया कडून मंजूर झाले. त्यांचे हे युनिट दरमहा १२ लाखांची उलाढाल करत आहे. एक स्वावलंबी उद्योजक आज १५ लोकांना रोजगार देत आहे. श्री कमलेश पानसरे म्हणतात की, मी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेचा आभारी आहे ज्याने लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच आमच्यासारख्या लोकांना स्वत:च्या पयावर उभे केले आहे.

# जिल्हा कार्यालये

## कोकण विभाग



**श्री.एस.ए भामरे**
उ.सह संचालक, कोकण



**श्रीम.वृषाली सोने**
महाव्यवस्थापक, जिउके पालघर



**श्री. ए.टी. पाटील**
महाव्यवस्थापक, जिउके ठाणे



**श्रीम. वी. डी. कुलकर्णी**
महाव्यवस्थापक, जिउके रत्नागिरी



**श्री. जी.एस. हरळया**
महाव्यवस्थापक, जिउके रायगड



**श्री. एस.एस. दामले**
महाव्यवस्थापक, जिउके सिंधुदुर्ग

## पुणे विभाग



**श्री.एस.एस. सुरवसे**
उ.सह संचालक, पुणे



**श्री.पी. डी. रेंदाळकर**
महाव्यवस्थापक, जिउके पुणे



**श्री. एस. डी. शेळके**
महाव्यवस्थापक, जिउके कोल्हापुर



**श्री. यु. एस. दंडगव्हाळ**
महाव्यवस्थापक, जिउके सातारा



**श्री. एस.एस गवळी**
महाव्यवस्थापक, जिउके सांगली

## छ. संभाजी नगर



**श्री. बी.टी. यशवंते**
उ.सह संचालक, छ. संभाजी नगर



**श्रीम. करुना खरात,**
महाव्यवस्थापक, जिउके छ.संभाजी नगर, जालना



**श्री. के.जी. तांदळे**
महाव्यवस्थापक, जिउके बीड



**श्री. पी.डी. हनबर**
महाव्यवस्थापक, जिउके धाराशिव

## नांदेड विभाग



**श्री. एन. बी. कोलेकर**
उप विभागीय अधिकारी नांदेड



**श्री. पी.डी. हनबर**
महाव्यवस्थापक, जिउके लातुर



**श्री. एस.ए कदारी**
महाव्यवस्थापक, जिउके हिंगोली



**श्री. अमोल इंगळे**
महाव्यवस्थापक, जिउके नांदेड



**श्री. अमोल बळे**
महाव्यवस्थापक, जिउके परभणी

# नाशिक विभाग



श्री. एस. जी. राजपुत
उ.सह संचालक नाशिक



श्री. एस.पी. पाटील
महाव्यवस्थापक, जिउके नाशिक



श्री. चेतन पाटील
महाव्यवस्थापक, जिउके जळगाव




श्री. ए. डी. दवंगे
महाव्यवस्थापक, जिउके अहमदनगर



श्री.उपेद्रा सांगळे
महाव्यवस्थापक, जिउके धुळे

# अमरावती विभाग



श्री. जी.ओ. भारती
उ.सह संचालक अमरावती



श्री. एस. एस. मुद्दमवार
महाव्यवस्थापक, जिउके अमरावती



श्री. एन. एस. निकम
महाव्यवस्थापक, जिउके अकोला व यवतमाळ



श्री. एस.डी. खंबायत
महाव्यवस्थापक, जिउके वाशिम



श्री. सुनिल पाटील
महाव्यवस्थापक, जिउके बुलढाणा

# नागपुर विभाग



श्री. जी.ओ. भारती
उ.सह संचालक नागपुर



श्री. एस. एस. मुद्दमवार
महाव्यवस्थापक, जिउके नागपुर



श्री. स्वप्निल राठोड
महाव्यवस्थापक, जिउके चंद्रपुर



श्रीम. एस. वी. बावनकुळे
महाव्यवस्थापक, जिउके वर्धा



श्री. हेमंत बदर
महाव्यवस्थापक, जिउके गोंदिया



श्री. वी.एन. शिवनकर
महाव्यवस्थापक, जिउके भंडारा



श्री. ए. आर. पवार
महाव्यवस्थापक, जिउके गडचिरोली

# एमएमआर विभाग



श्री. के.जी. डेकाटे ,
उ.सह संचालक एमएमआर



श्रीम. किर्ती जगताप
उपसंचालक, जिउके एमएमआर

महाराष्ट्र शासन

## अधिक माहिती व संपर्कासाठी

**उद्योग विभाग:**
उद्योग संचालनालय,
नविन प्रशासकीय इमारत, २ रा मजला,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०००३२

**महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र** (संबंधित जिल्हा)
**जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी** (संबंधित जिल्हा)

संकेतस्थळ

https://maha-cmegp.gov.in
www.maitri.mahaonline.gov.in
www.di.maharashtra.gov.in